मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर, नाशिक, जळगाव, चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी

# युवक आधार

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले






● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

■ वर्ष : ३ ■ अंक : ३११ ■ शुक्रवार, २४ जुलै २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514


## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त नविन पनवेल भाजप मंडलाचे रक्तदान शिबिर उत्साहात

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** महाराष्ट्राचे कार्यकुशल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त नवीन पनवेल भाजप मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेले भव्य रक्तदान शिबिर मोठ्या उत्साहात आणि सामाजिक बांधिलकीच्या भावनेत पार पडले. समाजहिताचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाला नागरिक आणि भाजप कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने रक्तदान केले.

न्यू पनवेल कर्नाटक संघ हॉल येथे आयोजित या शिबिराला प्रमुख मान्यवर म्हणून भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील तसेच सभागृहनेते ॲड. प्रकाश बिनेदार उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, एकनाथ गायकवाड, समीर ठाकूर, संतोष शेट्टी, शशिकांत शेळके, नगरसेविका कविता चौतमोल, सीता पाटील, राजेश्री वावेकर, डॉ. अस्मिता घरत, कुसुम पाटील, ॲड. शिवानी घरत, नवीन पनवेल शहर मंडळाचे सरचिटणीस प्रशांत फुलपागार, जगदीश घरत, पंकज घाडी, आरपीआयचे प्रभाकर कांबळे, नवीन पनवेल शहर मंडल युवा मोर्चा अध्यक्ष मयूर कदम, उत्तर रायगड जिल्हा युवा मोर्चा सरचिटणीस अक्षय सिंग, प्रभाग १५ अध्यक्ष संजय कांबळे, प्रभाग १६ अध्यक्ष शिवाजी भगत तसेच प्रभाग १७ अध्यक्ष विजय म्हात्रे उपस्थित होते. यावेळी आयोजक नवीन पनवेल भाजप मंडळाचे अध्यक्ष तथा नगरसेवक दशरथ म्हात्रे यांनी सर्वांचे स्वागत व आभार मानले.





यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यभर राबविण्यात येणाऱ्या समाजोपयोगी उपक्रमांचे कौतुक करत रक्तदान हे सर्वोत्तम दान असून गरजू रुग्णांसाठी जीवनदायी ठरत असल्याचे सांगितले. वाढदिवसाचे औचित्य साधून सामाजिक उत्तरदायित्व जपणाऱ्या अशा उपक्रमांचे आयोजन महत्वपूर्ण असल्याचे दशरथ म्हात्रे यांनी म्हंटले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. उपस्थित मान्यवरांनी रक्तदात्यांचे अभिनंदन करून त्यांच्या सामाजिक योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

# शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान उत्साहात

## महाड येथे महसूल समाधान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस वाढदिवसानिमित्त तसेच महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त महाड येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक येथे महाड-माणगाव-पोलादपूर विधानसभा मतदारसंघाच्या वतीने 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान' उत्साहात आयोजित करण्यात आले. राज्याचे रोजगार हमी योजना, फलोत्पादन व खारभूमी विकास मंत्री तथा महाड-माणगाव-पोलादपूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार ना. भरतशेठ गोगावले यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

यावेळी जिल्हा परिषद शिक्षण, अर्थ व क्रीडा सभापती चंद्रकांत कळंबे, जिल्हा परिषद सदस्य डॉ. निलेश कुंभार, मनाली काळीजकर, निलेश ताठरे, मन्सूर ताज, पंचायत समिती सभापती प्रेरणा सावंत, अनिता भिलारे, बिपिन महामुनकर, सुरेश महाडिक, महाड नगराध्यक्ष सुनील




कविस्कर, उपनगराध्यक्ष संदीप जाधव, उपविभागीय अधिकारी पोपट ओमासे, तहसीलदार महेश शितोळे, तहसीलदार कपिल घोरपडे, विविध शासकीय विभागांचे अधिकारी व कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

याप्रसंगी उपस्थित नागरिकांना मार्गदर्शन करताना मंत्री ना. भरतशेठ गोगावले म्हणाले की, शासनाच्या विविध योजनांचा लाभ थेट पात्र व गरजू नागरिकांपर्यंत पोहोचविणे हे शासनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

महसूल समाधान शिबिर ही लोकाभिमुख प्रशासनाची प्रभावी संकल्पना असून विविध शासकीय सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्याचा हा उपक्रम नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकारातून राबविण्यात येणाऱ्या या अभियानाचा नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

या शिबिरामध्ये जिवंत 7/12 मोहीम, सामाजिक अर्थसहाय्य (संजय गांधी व श्रावणबाळ) योजना, विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक दाखले, ॲग्रीस्टॅक योजना, मंजूर फेरफार प्रकरणांतील 7/12 व खाते उतारे वाटप, 7/12 दुरुस्ती अर्ज स्वीकारणे, डिजिटल 7/12 जनजागृती, भोगवटदार वर्ग-2 जमीन वर्ग-1मध्ये रूपांतराबाबत मार्गदर्शन, तुकडेबंदी कायद्याविषयी माहिती, अकृषक (एन.ए.) प्रक्रियेबाबत मार्गदर्शन, रेशन कार्ड अर्ज, जन्म-मृत्यू दाखले, नैसर्गिक आपत्ती नुकसानभरपाई ई-केवायसी, लक्ष्मी मुक्ती योजना, नवीन मतदार नोंदणी, ई-मोजणी, पीएम किसान योजना, आभा कार्ड, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना ई-केवायसी तसेच एस.टी. प्रवास स्मार्ट कार्ड यांसह विविध शासकीय सेवांचा लाभ नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आला.

महसूल समाधान शिबिराच्या माध्यमातून विविध शासकीय सेवा व योजनांचा लाभ नागरिकांना एकाच ठिकाणी सुलभपणे उपलब्ध झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. शासनाच्या सेवा अधिक प्रभावी, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख पद्धतीने जनतेपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

## नीट प्रकरणी पनवेलमध्ये शेकाप, मनसे आणि वंचितचे जोरदार आंदोलन; भर पावसात विद्यार्थ्यांचीही उपस्थिती, घोषणांनी परिसर दणाणला

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** नीट प्रवेश प्रक्रियेतील विविध मागण्यांसाठी छत्रपती शिवाजी महाराज चौक, पनवेलमध्ये शेतकरी कामगार पक्ष (शेकाप), महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) आणि वंचित बहुजन आघाडीच्या वतीने आंदोलन करण्यात आले. मुसळधार पावसाची पर्वा न करता मोठ्या संख्येने विद्यार्थी, पालक आणि कार्यकर्ते आंदोलनात सहभागी झाले.

भर पावसात हातात फलक घेऊन आंदोलनकर्त्यांनी केंद्र व संबंधित यंत्रणांविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी कोणताही तडजोडीचा खेळ होऊ



नये, दोषींवर कठोर कारवाई करावी आणि विद्यार्थ्यांना न्याय मिळावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. या आंदोलनामुळे परिसरात काही काळ घोषणांनी वातावरण दणाणून गेले. पोलिसांनी बंदोबस्त ठेवत परिस्थिती शांततेत नियंत्रणात ठेवली. आंदोलकांनी विद्यार्थ्यांच्या हितासाठी संघर्ष सुरूच ठेवण्याचा इशारा दिला. मुसळधार पावसाची तमा न बाळगता शेकडो विद्यार्थी, पालक आणि कार्यकर्ते आंदोलनात सहभागी झाल्याने परिसरात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले.

आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांनी हातात फलक घेऊन शासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. "विद्यार्थ्यांना न्याय मिळालाच पाहिजे, नीट प्रक्रियेत पारदर्शकता आणा, विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ थांबवा अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला. भर पावसातही आंदोलनकर्त्यांचा उत्साह कायम असल्याचे चित्र पाहायला मिळाले. शेकाप, मनसे आणि वंचितच्या पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांना पाठिंबा देत शासनाने तातडीने हस्तक्षेप करून विद्यार्थ्यांवरील अन्याय दूर करावा, अशी मागणी केली. नीट प्रवेश प्रक्रियेमुळे अनेक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य अंधारात गेल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला. काही काळ वाहतुकीवरही परिणाम झाल्याचे दिसून आले. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला. भर पावसात विद्यार्थ्यांनी दाखविलेल्या निर्धारामुळे हे आंदोलन शहरात चर्चेचा विषय ठरले.

दरम्यान, या आंदोलनामुळे नीट प्रकरण पुन्हा एकदा ऐरणीवर आले असून विद्यार्थ्यांच्या मागण्यांबाबत शासन कोणती भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे




महाराष्ट्र राज्याचे कार्यकुशल व लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच स्वतःच्या वाढदिवसाचे औचित्य साधून गुळसुंदे ग्रामपंचायतीचे सदस्य सतिश साठे यांनी वावेघर येथे आयोजित रक्तदान शिबिरात रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. या रक्तदान शिबिराला विभागीय जिल्हा परिषद अध्यक्ष डॉ. अविनाश गाताडे, गुरुनाथ गाताडे, चंदर माने यांच्यासह विविध पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. रक्तदान हे सर्वोच्च दान मानले जाते आणि अशा सामाजिक उपक्रमांमुळे समाजात रक्तदानाबाबत जनजागृती होऊन गरजू रुग्णांना जीवनदान मिळण्यास मोठी मदत होते, असा संदेश यावेळी देण्यात आला.

( दैनिक युवक आधार )

## पाटोद्याच्या जय भवानी महाविद्यालयात स्वर्गीय अजित दादा पवार यांना रक्तदान करून केले अभिवादन!

### माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची जयंती साजरी

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा बीड (प्रतिनिधी ) :-** पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयात महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित दादा पवार यांची जंयती साजरी करण्यात आली. प्रारंभी महाविद्यालयात प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे व प्रमुख पाहुणे मार्गदर्शक प्राचार्य डॉ.विश्वास कदम व मान्यवरांच्या शुभ हस्ते स्वर्गीय अजित दादा पवार यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर सामुहिक अभिवादन करण्यात आले. स्वर्गीय अजित दादा पवार यांच्या जंयती निमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभाग व आजिवन शिक्षण व विस्तार सेवा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने गेवराई येथे आ.विजयसिंह पंडित यांच्या संकल्पनेतुन "जनसेवा सप्ताह" मध्ये शारदा मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल



येथे भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या भव्य रक्तदान शिबीरात प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी व बहुसंख्य विद्यार्थ्यांनी रक्तदान करून माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित दादा पवार यांना अभिवादन करण्यात आले. या रक्तदान शिबीरास शारदा स्पोर्ट कल्ब चे कार्यवाह युवा नेते रणवीर काका पंडित, श्री.अमृत डावकर, प्रशासकीय अधिकारी श्री. प्रमोद गोरकर, प्रा.काशीनाथ गोगुले आदिनी भेट देवुन महाविद्यालयाच्या या रक्तदान शिबीराचे कौतुक केले. या शिबीरात रक्तदान केलेल्या रक्तदात्याना युवा नेते रणवीर काका पंडित यांच्या शुभ हस्ते प्रमाणपत्र देण्यात आली. हे रक्तदान यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी नाटककार प्रा.बापू घोक्षे, प्रा.डॉ.बंडू लोखंडे, अजिवन शिक्षण व विस्तार सेवा विभागाच्या समन्वयक प्रा.डॉ.कल्पना घारगे आदिनी अथक परिश्रम घेतले या प्रसंगी प्रा.डॉ.सुनिल जाधव, प्रा.गोपाळ धांडे, प्रा.सोमनाथ घाडगे, प्रा.विनोद किर्दक, प्रा.डॉ.प्रविण शिलेदार, प्रा.जाहेद सिद्दिकी, ग्रंथपाल प्रा.ज्योती रकटे, अनिल जाधव, नामदेव पोटफाडे, दिपक जावळे, श्रीमती साळूबाई नाईकनवरे व वरिष्ठ व कनिष्ठ विभागाचे सर्व प्राध्यापक वृंद आणि बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.




30 ते 35 वर्षांनंतर पांगुळ गावात लाल परीची एन्ट्री

# आ. विजयराजे पंडित व माजी आ. अमरसिंह पंडित यांच्या प्रयत्नांना यश



**दैनिक युवक आधार**

**कल्याण/रशीद शेख) :** गेवराई तालुक्यातील गोदावरी नदीच्या काठावर वसलेल्या पांगुळगावात तब्बल 30 ते 35 वर्षांनंतर आज एस.टी. बसची एन्ट्री झाली. बस आल्यावर गावकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला.

पांगुळगावात सुमारे 100 ते 150 घरे आहेत. येथील गावकरी सर्व धर्म समभावाने राहतात. लग्न असो, दवाखाना असो की धार्मिक कार्य, सर्वजण एकजुटीने पार पाडतात. मात्र आजपर्यंत गावात ना रस्ता होता ना दवाखाना. शेतकऱ्यांना शेतमाल बाजारात नेण्यासाठी, विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी दुसऱ्या गावी जाण्यासाठी आणि आजारींना उपचारासाठी पाऊलवाटेवरूनच जावे लागत होते. त्यामुळे मोठी अडचण होत होती.

गावकऱ्यांच्या मागणीनुसार *आमदार विजयराजे पंडित* व *माजी आमदार अमरसिंह शिवाजीराव पंडित* यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले. आजपासून *सकाळी 9 ते संध्याकाळी 5* या वेळेत पांगुळगावात एस.टी. सेवा सुरू झाली आहे.

लाल परी गावात येताच ग्रामस्थ, महिला मंडळ, बचत गट आणि लहान मुलांनी आनंदाने स्वागत केले. बस ड्रायव्हर व कंडक्टर यांना शाल-श्रीफळ देऊन गौरविण्यात आले. जेष्ठ नागरिक व ग्रामस्थांनी फोनद्वारे दोन्ही नेत्यांचे आभार मानले.

# 'अंतरा' कलेक्शन साठी सारा अली खानची नवीन मोहीम

## जाहिरात म्हणजे आधुनिक स्त्रीला वाहिलेली एक सिनेमॅटिक मानवंदना

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, प्रतिनिधी :** भारतातील सर्वात विश्वसनीय आणि आघाडीच्या दागिने कंपन्यांपैकी एक कल्याण ज्वेलर्सने बॉलीवूड अभिनेत्री सारा अली खानची आपली नवीन ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून घोषणा केली आहे. 'अंतरा' कलेक्शनसाठी एका आकर्षक मल्टी-मीडिया मोहिमेच्या माध्यमातून या भागीदारीची सुरुवात होत आहे; या कलेक्शनमध्ये ब्रँडचे उत्कृष्ट नैसर्गिक हिरे सादर करण्यात आले आहेत. ही जाहिरात म्हणजे आधुनिक स्त्रीला वाहिलेली एक सिनेमॅटिक मानवंदना आहे, जी आपल्या यशाचा आणि अनोख्या प्रवासाचा आनंद घेते; कालची स्वप्ने आजच्या वास्तवात रूपांतरित झाली आहेत या संकल्पनेवर ही जाहिरात आधारित आहे. युरोपियन शैलीतील दगडी रस्ते आणि सूर्यप्रकाशाने उजळलेले कॅफे अशा रमणीय पार्श्वभूमीवर आधारित ही फिल्म अशा एका स्त्रीचे चित्रण करते, जिने एकेकाळी पाहिलेले स्वप्न हेच तिचे सध्याचे वास्तव आहे.

महागड्या दागिन्यांच्या पारंपरिक सादरीकरण पेक्षा वेगळी वाट धरत, उत्साहाने आणि आनंदाने भरलेल्या सेलिब्रेशनचा भाव ही जाहिरात टिपते. व्हिंटेज कारमधील मजेशीर सफरी पासून ते एखाद्या गजबजलेल्या आउटडोअर बिस्ट्रोमध्ये वाढदिवसाच्या केकसोबतच्या हास्यविनोदापर्यंतचे क्षण...सारा अली खान अशा एका स्त्रीचे प्रतिनिधित्व करते जी लहान-मोठ्या अशा प्रत्येक यशाचा आनंद साजरा करते. ही मोहीम अंतरा कलेक्शनला स्त्रीच्या



दैनंदिन यशाची आणि वैयक्तिक प्रगतीची एक तेजस्वी साथीदार म्हणून सादर करते. यात स्त्रीत्वाचा मुक्त आविष्कार साजरा केला जातो, जिथे नैसर्गिक हिरे एका प्रवासाचा अविभाज्य भाग बनतात आणि त्यातून अभिमान तसेच आत्मविश्वासाची भावना दिसून येते.

स्वतःच्या वेगळेपणाबद्दल आत्मविश्वास बाळगणाऱ्या, परंपरांशी जोडलेल्या आणि तरीही आधुनिक दृष्टिकोन असलेल्या भारतीय महिलांच्या पिढीचे प्रतिनिधित्व सारा अली खान करते. ही वैशिष्ट्ये प्रभावी कथाकथन आणि प्रसन्न दृश्यांच्या माध्यमातून मांडली गेली आहेत; या कलेक्शनमधील प्रत्येक दागिना हा स्वतःची ओळख व्यक्त करण्याचे एक माध्यम म्हणून कसा काम करतो, हे दाखवण्यात आले आहे. वर्तमानातील अनमोल वारसा म्हणून तयार करण्यात आलेल्या या संग्रहात आकर्षक नेकलेस, अंगठ्या, कानातले आणि ब्रेसलेट्सचा समावेश आहे. नैसर्गिक हिऱ्यांची चमक आणि दुर्मिळता यांचा गौरव करणारे हे दागिने दैनंदिन वापरासोबतच विशेष प्रसंगांच्या वेळीही व्यक्तिमत्त्वात अभिजातता आणि सौंदर्य आणण्यासाठी अत्यंत बारकाईने घडवण्यात आले आहेत.

# बोकडवीरा येथील ज. ए. ई. शाळेचा डंका; ५ वी शासकीय स्कॉलरशिप व नवोदय परीक्षेत ४ विद्यार्थ्यांचे दैदिप्यमान यश!

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण / प्रतिनिधी :** तालुक्यातील वायु विद्युत केंद्र वसाहत बोकडवीरा येथील ज. ए. ई. ची पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत शाळेचा आणि उरण तालुक्याचा नावलौकिक उंचावला आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या इयत्ता पाचवीच्या शासकीय स्कॉलरशिप परीक्षेत शाळेच्या चार विद्यार्थ्यांनी तालुकास्तरीय गुणवत्ता यादीत स्थान मिळवले आहे. विशेष म्हणजे, या सर्व चारही विद्यार्थ्यांची 'केंद्रीय नवोदय विद्यालय' निवड परीक्षेतही निवड झाली असून



त्यांनी दुहेरी यश संपादन केले आहे.

पाचवीच्या शासकीय स्कॉलरशिप परीक्षेत आणि नवोदय विद्यालयाच्या प्रवेश परीक्षेत एकाच वेळी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचे यश खालीलप्रमाणे आहे : युवराज कचरे – उरण तालुकास्तरावर द्वितीय क्रमांक,सरिता बुरंगे – उरण तालुकास्तरावर सहावी, केरप्पा सांगोलकर – उरण तालुकास्तरावर सातवा क्रमांक.हर्षद कुटे – उरण तालुकास्तरावर दहावा क्रमांक.

विद्यार्थ्यांच्या या दैदिप्यमान यशामागे शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती हेमा कवळसे यांचे योग्य नियोजन व मार्गदर्शन लाभले. तसेच विद्यार्थ्यांना वर्षभर अत्यंत परिश्रमपूर्वक आणि दर्जेदार अध्यापन करणाऱ्या मार्गदर्शक शिक्षिका श्रीमती सई योगेश भस्मे यांचे मोलाचे योगदान मिळाले. या यशात विद्यार्थ्यांचे सातत्य आणि त्यांच्या पालकांचे लाभलेले खंबीर सहकार्य अत्यंत महत्त्वपूर्ण ठरले .

या अभूतपूर्व यशाबद्दल संस्थेचे संचालक मंडळ सदस्य तथा शालेय समिती अध्यक्ष महेश म्हात्रे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे त्यांच्या पालकांचे आणि मार्गदर्शक शिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले .शाळेच्या वतीने आयोजित विशेष कार्यक्रमात अध्यक्ष श्री महेश म्हात्रे यांच्या हस्ते सर्व स्कॉलरशिप आणि नवोदय पात्र विद्यार्थ्यांचा सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देऊन विशेष गौरव करण्यात आला. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना पुढील उच्च शिक्षणासाठी आणि उज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. या मोठ्या यशामुळे बोकडवीरा व संपूर्ण उरण परिसरातून शाळेचे कौतुक होत असून, विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# दिल्ली येथे जंतर मंतर वर झालेल्या विद्यार्थ्यांवरील लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ परतूर कडकडीत बंद

## विद्यार्थ्यांसाठी वंचित बहुजन आघाडी मैदानात

**दैनिक युवक आधार**

**परतूर-जालना(अशोक ठोके) :** दिल्ली येथे विद्यार्थ्यांवर झालेल्या अमानुष लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ आज परतूर शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला. वंचित बहुजन आघाडीच्या वतीने वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर यांच्या आदेशाने संपूर्ण महाराष्ट्र बंदचे या आवाहन करण्यात आले होते.त्यांच्या आदेशाचे पालन करत परतूर येथे वंचित बहुजन आघाडीच्या वतीने बंद मध्ये सहभाग घेत सर्व व्यापारी वर्गाने दुकाने स्वतःहून बंद केली होती. विद्यार्थ्यांच्या न्याय हक्कासाठी वंचित बहुजन आघाडी रस्त्यावर उतरली असून केंद्र सरकारच्या दडपशाही धोरणाचा यावेळी निषेध करण्यात आला. विद्यार्थ्यांवर केलेला लाठीहल्ला हा लोकशाहीला काळिमा फासणारा असून दोषी पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.या बंदला परतूर शहरातील व्यापारी, नागरिकांनी उत्स्फूर्त



प्रतिसाद दिला. शहरातील सर्व बाजारपेठ, दुकाने, आस्थापना पूर्णपणे बंद ठेवण्यात आल्या होत्या. बंद १०० टक्के यशस्वी झाला.

या आंदोलनात वंचित बहुजन आघाडीचे ज्येष्ठ नेते चोखाजी(नाना) सौंदर्य ,गौतम खंडागळे, तालुका अध्यक्ष हनुमंत मोरे, शहर अध्यक्ष राहुल नाटकर, स्वप्निल पहाडे, मनोज वंजारे, रामेश्वर वंजारे, जमीर शेख, प्रकाश म्हस्के, नामदेव नाचण प्रा.ॲड.सिद्धार्थ पानवाले, निवृत्ती पाईकराव,शिवाजी डोळस,रवींद्र भदर्गे, दिपक भदर्गे, विजय वेडेकर, विकास प्रधान, दिपक पंडित, अभिषेक अंभुरे, शिवाजी साळवे,आकाश गायकवाड, अरुण गायकवाड, युवराज म्हस्के, जीवन सोनवणे,रितेश घुगे, मोहन गायकवाड, योगेश गाते आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# मरणानंतरही मरणयातना कायम! विकास नक्की कोणासाठी? श्रीवर्धनमधील चक्रीवादळग्रस्तांची संतापजनक व्यथा

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी अनिकेत मोहित** : "मरणानंतर तरी माणसाच्या यातना संपतात," असे म्हटले जाते. मात्र, श्रीवर्धन तालुक्यातील काही गावांमध्ये परिस्थिती याच्या अगदी उलट आहे. मृत्यूनंतरच्या शेवटच्या प्रवासातही मृतदेहाला आणि नातेवाईकांना मरणयातना सोसाव्या लागत आहेत. एका बाजूला कोट्यवधी रुपयांच्या विकासकामांचे दावे युद्धपातळीवर केले जात असताना, दुसऱ्या बाजूला मात्र सामान्य जनतेच्या अंत्यसंस्कारासारख्या अतिशय मूलभूत सुविधेची दैना झाली आहे. यामुळे "विकासकामे नक्की कोणासाठी सुरू आहेत?" असा संतप्त सवाल आता सामान्य नागरिक विचारत आहेत.

**चक्रीवादळाचे घाव अजूनही**



**ओलेच**

काही वर्षांपूर्वी आलेल्या भीषण चक्रीवादळाचा तडाखा श्रीवर्धनमधील अनेक गावांना बसला होता. या वादळात अनेक गावांमधील स्मशानभूमींचे शेड उडून गेले, तर काहींची प्रचंड दुरवस्था झाली. मात्र, इतकी वर्षे उलटूनही येथील परिस्थिती 'जैसे थे' आहे. पावसाळ्यात उघड्यावर अंत्यसंस्कार करताना नातेवाईकांना ताडपत्री किंवा छत्र्या धरून उभे राहावे लागत आहे. निसर्गाच्या कोपानंतर लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने याकडे फिरवलेली पाठ अत्यंत क्लेशदायक आहे.

**मागण्यांकडे कानाडोळा, कोट्यवधींच्या कामांचा मात्र गाजावाजा**

स्थानिक ग्रामस्थांनी अनेक वेळा लेखी आणि तोंडी मागण्या करूनही या मूलभूत समस्यांकडे प्रशासनाने आणि नेतेमंडळींनी जाणूनबुजून कानाडोळा केल्याचा आरोप होत आहे. गावात रस्ते, सुशोभीकरण किंवा इतर हाय-फाय कामांसाठी कोट्यवधींचा निधी मंजूर होत असल्याचे चित्र आहे. मात्र, गावातील स्मशानभूमीची छप्पर दुरुस्त करण्यासाठी निधी मिळत नसल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

जनतेचा आर्त टाहो: सत्ताधारी असो की विरोधक, कोणीतरी धावून या!

"नेतेमंडळींकडे निवडणुकीपुरता वेळ असतो, पण आमच्या रोजच्या आणि मरणानंतरच्या प्रश्नांसाठी त्यांच्याकडे वेळ नाही," अशी भावना एका स्थानिक नागरिकाने व्यक्त केली. सत्ताधारी असो की विरोधक, राजकीय चिखलफेक बाजूला ठेवून आमच्या या गंभीर समस्या आधी सोडवा, अशी मागणी ग्रामस्थ करत आहेत.

**अजून किती उंबरे झिजवायचे?**

अतिशय हलाखीच्या परिस्थितीत जगणाऱ्या या जनतेला आता हक्काच्या मूलभूत सुविधांसाठी अजून कुठे आणि कोणाचे उंबरे झिजवायचे, असा यक्षप्रश्न पडला आहे. प्रशासनाने आतातरी या गंभीर बाबीची दखल घेऊन युद्धपातळीवर स्मशानभूमीची दुरुस्ती करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

# आकरा वर्षीय कुमारी अमुल्या प्रसाद शहा हिने मिळवले नेत्रदिपक यश

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख एम.डी.भोईर** : कै. नामिताई ठाकूर क्रीडा संकुल, अलिबाग येथे आयोजित *President's Trophy Swimming Competition 2026* मध्ये पनवेल तालुक्यातील नेरे गावच्या सध्या नवीन पनवेल येथे राहणाऱ्या आणि *MNR International School* मध्ये शिकणाऱ्या *११ वर्षीय अमुल्या प्रसाद शहा* हिने दैदिप्यमान यश मिळवले आहे.अमुल्याने या स्पर्धेत आपल्या अफलातून कामगिरीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तिने *फ्रीस्टाईल,




बॅकस्ट्रोक, ब्रेस्टस्ट्रोक आणि बटरफ्लाय* या चारही प्रकारांमध्ये प्रथम क्रमांक पटकावत *४ सुवर्णपदके* आणि *४ विजेतेपदाच्या ट्रॉफी* पटकावल्या.

कडक शिस्त, सातत्यपूर्ण सराव आणि जिंकण्याची जिद्द यामुळेच हे सुवर्ण यश शक्य झाले. मुसळधार पाऊस असो, थंडी असो की कठीण सराव - अमुल्या कधीही मागे हटली नाही.या यशाबद्दल MNR International School आणि नेरे गावकऱ्यांकडून तिचे कौतुक होत आहे. अमुल्याने भविष्यात राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राचे आणि भारताचे नाव उज्ज्वल करावे, अशा शुभेच्छा देण्यात आल्या.

# शैक्षणिक साहित्य वाटप करून अरविंद मोरे यांनी साजरा केला वाढदिवस

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : हल्ली वाढदिवस साजरा करणे हे फॅड झाले आहे. परंतु काही जण वेगळा विचार करतात आणि समाजाचे आपण काही देणे लागतो असा विचार करत असतात. असेच एक व्यक्तिमत्व अरविंद मोरे जे की गुणवंत कामगार व विशेष कार्यकारी अधिकारी आहेत ज्यांनी बँक ऑफ महाराष्ट्र मध्ये 40 वर्षे सेवा केली आहे व ते बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लॉईज युनियन, मुंबईचे अध्यक्ष आहेत. त्यांना सामाजिक कार्य करण्याची आवड आहे. ते गेल्या कित्येक वर्ष पासून सामाजिक कार्य करीत आहेत. अरविंद मोरे यांनी रायगड जिल्हा परिषद शाळा फणसवाडी, ता. पनवेल येथे शैक्षणिक साहित्य वाटप करून आपला वाढदिवस साजरा केला. ह्या शैक्षणिक वाटपात चित्रकला वही, चार रेघी वही, चौकटी वही, वाटर कलर व पॅड देऊन त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहित केले. मुलांच्या




चेहऱ्यावरचा आनंद बघून अरविंद मोरे यांनी खऱ्या अर्थाने वाढदिवस साजरा केल्याचे त्यांना समाधान झाले.

याप्रसंगी शाळेतील मुलांनी स्वतः बनविलेले पुष्प गुच्छ भेट कार्ड हे आजच्या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण होते. याप्रसंगी प्रा. डॉ. नीलिमा अरविंद मोरे, शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल, मुख्याध्यापिका नेहा गावंड, सविता सरगर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष भुऱ्या भगत आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी नेहा गावंड म्हणाल्या की अरविंद मोरे यांनी अशा प्रकारचा उपक्रम राबवून समाजाला सामाजिक जाण असल्याचा संदेश दिला. त्यामुळे इतरांना सुद्धा नक्कीच प्रेरणा मिळणार आहे. ह्या त्यांच्या वाढदिवसाच्या शैक्षणिक वाटपामुळे नक्कीच मुलांच्या कलागुणांना चालना मिळे व शिक्षणा विषयी गोडी निर्माण होईल. याप्रसंगी शाळे तर्फे शाल भेट देऊन त्यांचा सत्कार करून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

# "स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून श्रमदान

## पार्डी बु. येथील कनॉलची स्वच्छता'

**दैनिक युवक आधार**

**अर्धापूर गंगाधर कदमग्रामीण तालुका प्रतिनिधी** : पत्रकार गंगाधर कदम अर्धापूर प्रतिनिधी: स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, पार्डी बु. यांच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत गावातून जाणाऱ्या कनॉलची स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.गेल्या काही दिवसांपासून कनॉलमध्ये मोठ्या प्रमाणात गवत वाढल्याने तसेच साचलेल्या पाण्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली होती. यामुळे डासांची उत्पत्ती वाढून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला होता. तसेच सापांचा वावर वाढल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. ही बाब लक्षात घेऊन राष्ट्रवादी



काँग्रेस पार्टीच्या कार्यकर्त्यांनी श्रमदानातून कनॉलमधील गवत व कचरा काढून परिसर स्वच्छ केला.या स्वच्छता अभियानात जयदीप नारायणराव बागल, संभाजी दळवी, माजी पंचायत समिती सदस्य तुकारामजी संबोड, शिवलिंग आप्पा रणखांब, साहेबराव पतंगे, दत्तात्रय बागल, पत्रकार राहूल मगरे यांच्यासह गावातील अनेक ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.या उपक्रमामुळे कनॉल परिसर स्वच्छ व सुरक्षित झाला असून ग्रामस्थांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले.

## शिबिरातील गैरव्यवस्थेवर स्वप्निल गावंडे, भाजपा तालुका अध्यक्ष यांचा आक्षेप; चौकशीची मागणी

**दैनिक युवक आधार**

**दर्यापूर ज्ञानेश्वर काळे |तालुका प्रतिनिधी** : दर्यापूर येथे आयोजित करण्यात आलेल्या 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान' शिबिरामध्ये झालेल्या प्रशासकीय निष्काळजीपणा, अपुरे नियोजन आणि दिव्यांग, वृद्ध तसेच सर्वसामान्य नागरिकांची झालेली गैरसोय याप्रकरणी सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी श्री. स्वप्निल जनार्दन गावंडे, भाजपा तालुका अध्यक्ष (पश्चिम मंडळ), दर्यापूर यांनी तहसीलदारांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.



निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या अभियान शिबिरात मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. मात्र शिबिराचे नियोजन अत्यंत अपुरे असल्याने नागरिकांना मोठ्या प्रमाणात मनस्ताप सहन करावा लागला. विशेषतः दिव्यांग, अपंग व ज्येष्ठ नागरिकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात प्रशासन अपयशी ठरल्याचा आरोप करण्यात आला आहे.तसेच दर्यापूर व अंजनगाव सुर्जी या दोन तालुक्यांसाठी अत्यल्प कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्याने अनेक नागरिकांची कामे वेळेत पूर्ण होऊ शकली नाहीत. शासनाच्या महत्त्वाकांक्षी अभियानाची प्रतिमा त्यामुळे मलिन झाल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.याशिवाय शिबिरासाठी शासनाकडून मंजूर झालेल्या निधीचा व प्रत्यक्ष झालेल्या खर्चाचा तपशील सार्वजनिक करण्यात यावा, तसेच संपूर्ण खर्चाचे लेखापरीक्षण करून नागरिकांसमोर अहवाल सादर करावा, अशी मागणीही करण्यात आली आहे.शिबिरातील निष्काळजीपणा व गैरव्यवस्थेस जबाबदार असलेल्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तातडीने प्रशासकीय कारवाई करण्यात यावी, अन्यथा याप्रकरणी वरिष्ठ स्तरावर पाठपुरावा करण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.या निवेदनाची प्रत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि जिल्हाधिकारी, अमरावती यांना पाठविण्यात आली असून, व तहसीलदार श्री रवींद्र कांनजडे यांना निवेदन देण्यात आले .नागरिकांच्या अडचणींची तातडीने दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी श्री. स्वप्निल जनार्दन गावंडे, भाजपा तालुका अध्यक्ष (पश्चिम मंडळ), दर्यापूर यांनी केली आहे.

## पनवेल महानगरपालिकेच्या निष्काळजी आणि बेजबाबदार कारभाराचा शिवसेना (उबाठा) पक्षाने केला संताप व्यक्त

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** पनवेल महानगरपालिकेच्या निष्काळजी आणि बेजबाबदार कारभाराचा आणखी एक धक्कादायक नमुना खारघरमध्ये समोर आला आहे. पावसाळ्यापूर्वी धोकादायक झाडांची छाटणी करण्यासाठी लाखो रुपयांची कामे मंजूर झाल्याचा दावा केला जात असताना, प्रत्यक्षात अनेक ठिकाणी झाडांच्या फांद्या आजही रस्त्यावर, वीजवाहिन्यांवर आणि वाहनांवर धोकादायक अवस्थेत लोंबकळत असल्याचे वास्तव आहे. याच निष्काळजीपणाचा फटका दिनांक 21 जुलै 2026 रोजी खारघर सेक्टर 13 येथील एन.के.जी.एस. बी बँकेजवळ बसला असून, एका मोठ्या झाडाची फांदी उभ्या असलेल्या कारवर कोसळल्याने वाहनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, ही घटना एखाद्या नागरिकाच्या जीवावरही बेतू शकली असती. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपशहर प्रमुख नंदू वारुंगसे यांनी या घटनेनंतर पनवेल महानगरपालिकेच्या कार्यपद्धतीवर तीव्र



संताप व्यक्त केला आहे.

त्यांनी सांगितले की, पावसाळा सुरू होण्यापूर्वीच खारघर परिसरातील धोकादायक झाडे आणि लोंबकळणाऱ्या फांद्यांची छाटणी करण्यासाठी त्यांनी अनेक वेळा लेखी पत्रव्यवहार करून प्रशासनाला इशारा दिला होता. संबंधित अधिकाऱ्यांचे लक्ष वेधून संभाव्य दुर्घटनांची शक्यता स्पष्टपणे मांडली होती. मात्र, प्रशासनाने या निवेदनांकडे दुर्लक्ष केले आणि वेळेत कोणतीही प्रभावी कारवाई केली नाही. या घटनेमुळे प्रशासनाच्या दाव्यांवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. झाडांच्या छाटणीसाठी निधी खर्च झाल्याचा दावा केला जात असला, तरी प्रत्यक्षात अनेक रस्त्यांवर धोकादायक झाडे कायम आहेत. त्यामुळे कामे प्रत्यक्ष झाली की केवळ कागदोपत्री पूर्ण झाल्याचे दाखवून बिले मंजूर करण्यात आली, असा संशय व्यक्त केला जात आहे.

वारुंगसे यांनी आरोप केला की, "ठेकेदार मालामाल आणि जनता संकटात" अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. सामान्य नागरिकांच्या कराच्या पैशातून मंजूर होणाऱ्या विकासकामांचा लाभ नागरिकांना मिळण्याऐवजी काही ठेकेदार आणि संबंधित यंत्रणेलाच होत असल्याचे चित्र दिसत आहे. प्रत्यक्षात कामांचा दर्जा तपासला जात नाही, अधिकाऱ्यांकडून पाहणी केली जात नाही आणि नागरिकांच्या तक्रारींकडेही गांभीर्याने पाहिले जात नाही, असा आरोप त्यांनी केला.

त्यांनी प्रश्न उपस्थित केला की, जर पावसाळ्यापूर्वी झाडांची छाटणी व्यवस्थित झाली असती, तर आज ही घटना घडली असती का? या घटनेत सुदैवाने केवळ वाहनाचे नुकसान झाले; मात्र एखादा नागरिक, विद्यार्थी किंवा दुचाकीस्वार त्या ठिकाणी असता तर त्याची जबाबदारी कोण स्वीकारली असती? या प्रकरणाची स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी करून झाडांच्या छाटणीसाठी मंजूर झालेल्या निधीचा वापर, काम करणारे ठेकेदार, कामाची प्रत्यक्ष पाहणी करणारे अधिकारी आणि काम पूर्ण झाल्याचे प्रमाणित करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी श्री. वारुंगसे यांनी केली आहे. तसेच निष्काळजीपणा करणाऱ्या अधिकारी व ठेकेदारांवर कठोर प्रशासकीय आणि कायदेशीर कारवाई करावी, अशीही त्यांनी मागणी केली. याशिवाय खारघरमधील सर्व धोकादायक झाडांचे तातडीने सर्वेक्षण करून झाडांची छाटणी करण्यात यावी, नागरिकांच्या जीवित आणि मालमत्तेची सुरक्षा सुनिश्चित करावी आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कायमस्वरूपी कार्यपद्धती राबवावी, अशी मागणीही त्यांनी केली. या घटनेनंतर स्थानिक नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण असून, पनवेल महानगरपालिकेने केवळ कागदोपत्री कामे दाखवून समाधान मानू नये, तर प्रत्यक्ष मैदानात उतरून नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष आद. ऍड. बाळासाहेब आंबेडकर यांनी पुकारलेल्या दि. २३ जुलै २०२६ गुरूवार रोजी विद्यार्थ्याच्या समर्थनार्थ महाराष्ट्र बंदला वावोशी फाटा बाजारपेठेतून उस्फुर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**खालापूर - संतोष शेवाळे** : दिल्ली येथे संविधातील मार्गाने चालू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर अमानुषपणे लाठी चार्ज करण्यात आला असून हे देशाच्या लोकशाहीला काळिंबा फासणारे कृत्य आहे, यामध्ये खूप प्रमाणात विद्यार्थी जखमी झाले असून त्यांच्या मनावर याचे विपरीत परिणाम घडू शकतात आणि यातून देशाच्या भवितव्यास बाधा निर्माण होवू शकते.विद्यार्थी हे देशाचे भविष्य आहे आणि त्यांच्या शैक्षणिक अधिकारासाठी लढण्यास त्यांना देशाचे संविधान




अधिकार देते परंतु सध्यास्थितीत चालू असलेली दडपशाही हि लोकशाही आणि देशाहिताची नाही.तरी या दडपशाहीला विरोध करण्यासाठी आणिलोकशाही जिवंत ठेवण्यासाठी हयाविद्यार्थ्यांच्यावर झालेल्या अन्यायाविरोधात तसेच आपल्या मुलांच्या भविष्यातील शैक्षणिक धोरणासाठी आज खालापूर तालुक्यातील छतीशी भागातील वावोशी फाटा,बाजारपेठ बंद ठेवण्यास युवा उदयोजक श्री.पंकज हाडप यांनी आव्हान केले .वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष आद.ऍड.बाळासाहेब आंबेडकर यांच्या सूचनेने वंचित बहुजन आघाडी खालापूर तालुक्याच्या वतीने हया बंद ला आमचा पूर्ण पाठिंबा देऊन आणि महाराष्ट्र बंद मध्ये सामील आहोत

## अभय नगर मध्ये भटक्या कुत्र्यांचा धुमाकूळ; एकाच दिवशी ४ ते ५ नागरिकांना चावा, रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण

**दैनिक युवक आधार**

**कल्याण रमेश राऊत ग्रामीण प्रतिनिधी** : दि.२४शिळफाटा (ठाणे):ठाणे महानगरपालिका हद्दीतील अभय नगर परिसरात भटक्या कुत्र्यांचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत असून, एकाच दिवशी चार ते पाच नागरिकांना भटक्या कुत्र्यांनी चावा घेतल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकारामुळे परिसरातील रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिला घराबाहेर पडताना धास्तावल्या आहेत.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, परिसरात भटक्या कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून, शहरी भागातील भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण करून त्यांना खेळण्या-पाड्यातील मोकळ्या जागेत सोडले जाते मग ते भटके कुत्रे आजूबाजूच्या लोकवस्तीत जाऊन तेथे लोकांना त्रास देत असतात, अनेक वेळा तक्रारी करूनही प्रशासनाने ठोस उपाययोजना केलेली नाही. त्यामुळे अशा घटना वारंवार घडत असून नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

नागरिकांनी ठाणे महानगरपालिका प्रशासनाने तातडीने अभय नगर परिसरातील भटक्या कुत्र्यांना पकडून त्यांचे निर्बीजीकरण व पुनर्वसन करण्याची मागणी केली आहे. तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

### खाजगी सुरक्षा रक्षकांना 55 टक्के आरक्षणाची मागणी

## महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक श्रम कामगार युनियनचे शासनाला निवेदन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : राज्यातील सर्व खाजगी सुरक्षा रक्षक मंडळांमधील मंजूर पदभरती प्रक्रियेत नोंदणीकृत व कार्यरत सुरक्षा रक्षकांना किमान 55 टक्के अंतर्गत आरक्षण अथवा प्राधान्य देण्यात यावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक श्रम कामगार युनियनने राज्य शासनाकडे केली आहे.

युनियनचे रायगड जिल्हा सरचिटणीस विनायक चंद्रकांत गांधी यांनी उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या प्रधान सचिवांना यासंदर्भात सविस्तर निवेदन सादर केले आहे. निवेदनात महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, 1981 अंतर्गत कार्यरत सुरक्षा रक्षक अनेक वर्षांपासून अल्प वेतनात प्रामाणिक सेवा बजावत असून त्यांना कामाचा प्रदीर्घ अनुभव असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

त्यामुळे मंडळांमधील लिपिक, निरीक्षक, सहाय्यक, कार्यालयीन कर्मचारी आदी पदांवरील भरतीमध्ये अनुभवी सुरक्षा रक्षकांना अंतर्गत आरक्षण किंवा प्राधान्य देण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच किमान पाच वर्षे नियमित सेवा केलेल्या सुरक्षा रक्षकांना प्राधान्य, सेवाअनुभवानुसार अतिरिक्त गुण, विभागीय निवड प्रक्रियेद्वारे पदोन्नतीची संधी तसेच आवश्यकतेनुसार प्रशिक्षण व कौशल्यविकासाची सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणीही करण्यात आली आहे.

अनुभवी सुरक्षा रक्षकांच्या सेवेला न्याय मिळावा, प्रशासनाची कार्यक्षमता वाढावी आणि त्यांच्या अनुभवाचा प्रभावी उपयोग व्हावा, यासाठी शासनाने या मागण्यांचा सकारात्मक विचार करून आवश्यक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक श्रम कामगार युनियनने व्यक्त केली आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त "आपले आरोग्य.. आमची जबाबदारी" आयोजित भव्य आरोग्य शिबिरास प्रारंभ

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा रुग्णालय, अलिबाग-रायगड यांच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच दिवंगत माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या भव्य आरोग्य शिबिराचा उद्घाटन समारंभ आज उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. हे आरोग्य शिबिर दि. 22 जुलै ते1 ऑगस्ट 2026 या कालावधीत आयोजित करण्यात आले असून, नागरिकांना विविध आरोग्य सेवा पूर्णपणे मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.




शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी अधिष्ठाता डॉ. पूर्वा पाटील, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शीतल जोशी, वैद्यकीय अधीक्षक डॉ. मयुरी कांबळे, शिबिराचे नोडल अधिकारी डॉ. संतोष हराळकर, डॉ. सुधाकर बंटेवाड तसेच प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी, विविध विभागांचे विभागप्रमुख, वैद्यकीय अधिकारी, समाजसेवा अधीक्षक, परिचारिका, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते फीत कापून शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.


यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतात आरोग्य हीच खरी संपत्ती असल्याचे सांगत आजारांचे लवकर निदान व वेळेवर उपचार होण्यासाठी अशा आरोग्य शिबिरांचे महत्त्व अधोरेखित केले. प्रत्येक नागरिकाने नियमित आरोग्य तपासणी करून स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.

मुख्यमंत्री सहायता निधी कक्षामार्फत जिल्हाभर आयोजित करण्यात आलेल्या या विशेष शिबिरात रक्तदान शिबिर, स्तन कर्करोग तपासणी, गर्भाशय मुखाच्या कर्करोगाची तपासणी, बोन मिनरल डेन्सिटी (बीएमडी) तपासणी तसेच नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबिर अशा विविध आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या सर्व सेवा संबंधित विभागांमार्फत तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली पूर्णपणे मोफत उपलब्ध करून दिल्या जाणार असून, नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन अधिष्ठाता डॉ. पूर्वा पाटील यांनी केले.

कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन अत्यंत शिस्तबद्ध आणि प्रभावी पद्धतीने करण्यात आले. उपस्थित नागरिकांनी शिबिराबाबत समाधान व्यक्त करून प्रशासनाच्या या लोकाभिमुख उपक्रमाचे स्वागत केले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवर, अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांचे आभार मानण्यात आले. "आपले आरोग्य.. आमची जबाबदारी" या घोषवाक्याला साजेसा हा उपक्रम समाजाच्या आरोग्य संवर्धनासाठी निश्चितच महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## ज्येष्ठ नागरिक बेपत्ता

**दैनिक युवक आधार**




**पनवेल, (वार्ताहर) :** खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नवीन पनवेल परिसरातून 65 वर्षीय ज्येष्ठ नागरिक बेपत्ता झाल्याची घटना घडली असून, या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात मिसिंगची नोंद करण्यात आली आहे. पोलिसांनी नागरिकांना संबंधित व्यक्तीबाबत माहिती मिळाल्यास तात्काळ संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.बेपत्ता व्यक्तीचे नाव प्रोणजीत गोपीचंद दास (वय 65) असे असून ते नवीन पनवेल येथील रहिवासी आहेत. ते घरातून बाहेर पडले. कामावर जात असल्याचे सांगून गेलेले प्रोणजीत दास त्यानंतर घरी परतले नाहीत. नातेवाईकांनी सर्वत्र शोध घेतल्यानंतरही त्यांचा ठावठिकाणा लागला नसल्याने खांदेश्वर पोलीस ठाण्यात बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल करण्यात आली. प्रोणजीत दास यांचा रंग सावळा, उंची सुमारे 5 फूट 8 इंच, केस काळे, मिशी पांढरी, डोळे काळे असून अंगात लाल रंगाचा टी-शर्ट आणि काळ्या रंगाची पॅन्ट परिधान केलेली होती. त्यांना हिंदी भाषा बोलता येते. या प्रकरणाचा तपास खांदेश्वर पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार मनोहर पाटील करीत आहेत. संबंधित व्यक्तीबाबत कोणाला काही माहिती मिळाल्यास खांदेश्वर पोलीस ठाणे किंवा 8655354113 या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## जंतरमंतरवरील विद्यार्थ्यांवरील लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ 'धर्मेंद्र प्रधान व सदाभाऊ खोत 'यांच्या प्रतिमेला लिंबागणेशमध्ये 'जोडे मारो' आंदोलन

### धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी; सदाभाऊ खोत यांच्या वक्तव्याचाही निषेध :- डॉ.गणेश ढवळे

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी)** - दिल्लीतील जंतरमंतर येथे नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीहल्ल्याचा तसेच आंदोलनकर्त्यांबाबत सदाभाऊ खोत यांनी 'दहशतवादी ' संबोधुन करण्यात आलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याच्या निषेधार्थ दिनांक २३ जुलै गुरुवारी रोजी लिंबागणेश ता.बीड येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज चौकात आयोजित या आंदोलनात



केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान व सदाभाऊ खोत यांच्या प्रतिमेला जोडे मारून निषेध व्यक्त करण्यात आला. या वेळी "धर्मेंद्र प्रधान राजीनामा द्या", "दिल्ली पोलिस मुर्दाबाद", "विद्यार्थ्यांवरील अत्याचार बंद करा" ' सदाभाऊ नव्हे हा तर भाडखाऊ 'अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. आंदोलनानंतर जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षक, बीड यांच्या मार्फत राष्ट्रपती, पंतप्रधान, केंद्रीय गृहमंत्री, महाराष्ट्राचे राज्यपाल तसेच मुख्यमंत्री व गृहमंत्री यांना निवेदन पाठविण्यात आले. या आंदोलनात सेवा सोसायटीचे चेअरमन रविबापू निर्मळ, अँड.गणेश वाणी, सुरेश निर्मळ, शिवशक्ती भिमशक्ती विचारमंचचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील, संतोष भोसले, सर्पमित्र अशोक जाधव, ज्ञानेश्वर कुदळे, सुंदर येडे, सोमीनाथ आमटे, सितराम थोरात, रामहरी चाळक, गुलाब कांबळे, नाना निर्मळ, अमोल निर्मळ, अशोक गोंडे, रामचंद्र मुळे यांच्या सह आदी जण सहभागी झाले होते.

'विद्यार्थ्यांवरील लाठीमार लोकशाहीला काळिमा' :– डॉ. गणेश ढवळे
लोकशाही व्यवस्थेत नागरिकांना व विद्यार्थ्यांना शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करून आपल्या मागण्या मांडण्याचा घटनात्मक अधिकार आहे. जंतरमंतर येथे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेला कथित लाठीमार हा लोकशाही मूल्यांवर आघात असून, या प्रकरणाची एसआयटीमार्फत चौकशी करून दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली.

- प्रमुख मागण्या
- नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी.
- केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा.
- जंतरमंतर येथील आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांवरील कथित लाठीहल्ल्याची एसआयटीमार्फत चौकशी करावी.
- दोषी पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी.
- आंदोलनकर्त्यांबाबत करण्यात आलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याचा निषेध करून संबंधितांनी दिलगिरी व्यक्त करावी.

# चौल-रेवदंड्यात नारळ उत्पादकांसाठी ज्ञानमेळावा; आधुनिक तंत्रज्ञान, अनुदान योजनांमुळे उत्पादनवाढीचा नवा मार्ग खुला

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे रेवदंडा :** कोकणातील नारळ बागायतीला अधिक सक्षम, उत्पादनक्षम आणि आर्थिकदृष्ट्या फायदेशीर बनविण्यासाठी नारळ विकास बोर्ड, ठाणे (कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार) यांच्या पुढाकारातून चौल-रेवदंडा परिसरातील नारळ उत्पादक शेतकऱ्यांसाठी विशेष नारळ लागवड प्रात्यक्षिक व मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. आधुनिक शेती तंत्रज्ञान, शासकीय अनुदान योजना आणि उत्पादनवाढीच्या प्रभावी उपाययोजनांची माहिती मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

रेवदंडा येथील प्रगतशील शेतकरी दिलीप पाटील यांच्या निवासस्थानी पार पडलेल्या या कार्यशाळेला चौल व रेवदंडा परिसरातील नारळ उत्पादक शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. शेतीसमोरील वाढती आव्हाने, बदलते हवामान, उत्पादन खर्चातील वाढ आणि बाजारपेठेतील स्पर्धा यांचा सामना करताना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड किती महत्त्वाची आहे, यावर या कार्यशाळेत सखोल मार्गदर्शन करण्यात आले.



कार्यक्रमात तालुका कृषी मंडळ अधिकारी सूर्यवंशी यांनी शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतीसाठी उपयुक्त ठरणाऱ्या 'गोअमृत' या जैविक द्रावणाची घरच्या घरी निर्मिती कशी करावी याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सादर केले. कमी खर्चात तयार होणारे हे मिश्रण जमिनीची सुपीकता वाढविण्यास, पिकांची वाढ सुधारण्यास आणि उत्पादनात वाढ करण्यास उपयुक्त ठरते, अशी माहिती त्यांनी दिली. रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी करून सेंद्रिय शेतीकडे वाटचाल करण्याची गरज त्यांनी यावेळी अधोरेखित केली.याशिवाय जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कृषी योजनांची माहिती देताना सूर्यवंशी यांनी शेतकऱ्यांनी शासनाच्या योजनांचा लाभ घेऊन आपल्या शेतीचा विकास साधावा, असे आवाहन केले.नारळ विकास बोर्डाचे उपसंचालक रवींद्र कुमार सिंह यांनी नारळ लागवडीसाठी उपलब्ध असलेल्या विविध अनुदान योजनांची सविस्तर माहिती दिली. नारळ बागांचे संवर्धन, नवीन लागवड, ठिबक सिंचन, उत्पादकता वाढविण्यासाठी उपलब्ध सुविधा, मोफत खत वितरण तसेच

## नारळ विकास बोर्डाच्या कार्यशाळेत अनुदान, 'केरा सुरक्षा' योजना, मोफत खत आणि सेंद्रिय शेतीचे प्रात्यक्षिक; चौल-रेवदंड्यातील शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

पाडेकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या 'केरा सुरक्षा' योजनेविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. केंद्र व राज्य शासनाच्या कृषीपूरक योजनांचा प्रभावी वापर केल्यास नारळ उत्पादकांचे उत्पन्न वाढण्यास मोठी मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.कार्यशाळेदरम्यान शेतकऱ्यांनी नारळ बागांमधील रोग व कीड नियंत्रण, हवामान बदलाचा परिणाम, खत व्यवस्थापन, उत्पादन खर्च कमी करण्याचे उपाय आणि बाजारपेठेतील संधी यासंदर्भात विविध प्रश्न उपस्थित केले. तज्ज्ञांनी त्यांना सविस्तर उत्तरे देत आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचा सल्ला दिला.नारळ ही कोकणातील अर्थकारणाची महत्त्वाची जीवनवाहिनी मानली जाते. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना थेट तज्ज्ञांचे मार्गदर्शन, शासकीय योजनांची माहिती आणि प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांचा लाभ मिळाल्याने या उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे.

कार्यशाळेमुळे अनेक शेतकऱ्यांना नारळ उत्पादनवाढीच्या नव्या संधींची माहिती मिळाली असून भविष्यात अशा अधिक कार्यशाळांचे आयोजन व्हावे, अशी अपेक्षा उपस्थितांनी व्यक्त केली.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कृषक कल्याणकारी संस्थेचे अध्यक्ष प्रमोद पाटील, माजी अध्यक्ष रवींद्र पाटील, उपाध्यक्ष दिलीप पाटील, वसंत घरत, विनायक थळकर, सुधाकर राऊळ तसेच सचिव प्रकाश पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित शेतकऱ्यांनी मार्गदर्शनाबद्दल समाधान व्यक्त करत नारळ बागायतीच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांची नितांत गरज असल्याचे मत व्यक्त केले.

# मग तरुणाईने दाद मागायची तरी कोणाकडे?

ज्या देशाची ६० टक्क्यांपेक्षा जास्त लोकसंख्या तरुण आहे, ज्या देशाच्या भविष्याची सूत्रे उद्याच्या पिढीच्या हातात आहेत, त्याच देशातील तरुणाई आज रस्त्यावर लाठ्या-काठ्या खात आहे. जेव्हा लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य टांगणीला लागते, जेव्हा आपल्या न्याय्य मागण्यांसाठी रस्त्यावर उतरलेल्या तरुणांवर लाठीमार होतो, त्यांना फरफटत नेले जाते आणि या अन्यायाविरुद्ध न्यायाची शेवटची आशा म्हणून हे तरुण जेव्हा सर्वोच्च न्यायालयाचे दार ठोठावतात... तेव्हा तिथून उत्तर येते— "आमचा वेळ वाया घालवू नका, आमच्याकडे तुमच्या मारहाणीचे व्हिडिओ पाहण्यासाठी वेळ नाही!"




हे वक्तव्य केवळ एका प्रकरणापुरते मर्यादित नाही, तर ते या देशातील कोट्यवधी तरुणांच्या आशेवर फिरवलेले पाणी आहे. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती जेव्हा अशा प्रकारे "वेळ नाही" असे सांगतात, तेव्हा प्रश्न उपस्थित होतो की— जर सरकार ऐकत नसेल आणि सर्वोच्च न्यायालयही पाठ फिरवणार असेल, तर या देशातील सामान्य नागरिकाने आणि तरुणाईने दाद मागायची तरी कोणाकडे?

**न्यायसंस्थेची भूमिका आणि जनतेचा विश्वास**

लोकशाहीचे तीन महत्त्वाचे स्तंभ जेव्हा अपयशी ठरताना दिसतात, तेव्हा चौथा स्तंभ आणि न्यायव्यवस्था हेच सामान्य माणसाचे एकमेव छत्र असतात. पोलिसांच्या अत्याचाराचे किंवा आंदोलकांवरील लाठीमाराचे व्हिडिओ पाहणे म्हणजे वेळ वाया घालवणे आहे का? जर देशाच्या भविष्याशी जोडलेल्या मुद्द्यांवर उच्च व सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार नसेल, तर न्यायाची व्याख्या उरते तरी काय?

विशेष म्हणजे, यापूर्वीच्या काही वक्तव्यांमधून आणि भूमिकेतून तरुणांमध्ये तीव्र असंतोष पसरला होता, ज्यातून विविध आंदोलने आणि राजकीय पडसाद उमटले. आज हे आंदोलन केवळ देशापुरते मर्यादित राहिलेले नसून 'आंतरराष्ट्रीय मीडिया'मध्येही त्याची दखल घेतली जात आहे. जगभरात देशाच्या लोकशाहीची आणि न्यायव्यवस्थेची चर्चा होत असताना, आपल्या देशात मात्र विद्यार्थ्यांच्या आक्रोशाकडे पाहण्यासाठी "वेळ नाही" हे उत्तर मिळणे अत्यंत खेदजनक आहे.

**प्रश्नांची सरबत्ती: उत्तर कोणाकडे?**

प्रशासन गप्प का? तरुणांच्या भवितव्याशी खेळणारे गैरप्रकार रोखण्यात शासन आणि प्रशासन का अपयशी ठरत आहे?

हक्कांचे काय? शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करणे आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे हा संविधानाने दिलेला मूलभूत अधिकार नाही का?

संवेदनशीलतेचा दुष्काळ: न्यायालये जर तांत्रिक मुद्द्यांमध्ये गुंतून संवेदनशीलता विसरणार असतील, तर सामान्य माणसाचा व्यवस्थेवरील विश्वास कसा टिकून राहणार?

**थोडक्यात सांगायचे तर...**

तरुणाईचा हा आक्रोश केवळ एका परीक्षेपुरता किंवा एका आंदोलनापुरता मर्यादित नाही. हा व्यवस्थेविरुद्धचा संताप आहे. न्यायालयाने आणि शासनाने हे लक्षात ठेवले पाहिजे की, तरुण पिढीचा संताप आणि निराशा देशाच्या आरोग्यासाठी कधीही हिताची नसते. "वेळ नाही" म्हणून डोळे झाकण्यापेक्षा, या तरुणांच्या प्रश्नांवर गांभीर्याने आणि संवेदनशीलतेने तोडगा काढणे ही काळाची गरज आहे. अन्यथा, लोकशाहीच्या या स्तंभांवरील जनतेचा उरलासुरला विश्वासही डळमळीत व्हायला वेळ लागणार नाही!

# रायगड जिल्ह्यातील 550 शेतकऱ्यांना मत्स्यबीजाचे वाटप

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच स्वर्गीय अजितदादा पवार माजी उपमुख्यमंत्री यांच्या जयंतीनिमित्त रायगड जिल्हा परिषद शाळा, खोपटे, ता. उरण येथे आयोजित कार्यक्रमात जिल्ह्यातील 550 शेतकऱ्यांना मत्स्यबीजाचे वाटप करण्यात आले. यावेळी मत्स्यपालन क्षेत्राचा विकास हा रायगड जिल्ह्याच्या आर्थिक प्रगतीसाठी महत्त्वाचा असून शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन, प्रशिक्षण, वित्तीय सुविधा आणि बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले.

यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्रीमती वंदना शिंदे, तहसीलदार उद्धव कदम, तालुका कृषी अधिकारी अर्चना सूळ, पंचायत समिती सदस्या श्रीमती कविता पाटील, तारपोवाला सागरी जीव शास्त्र केंद्राचे डॉ. भरत यादव,डॉ. रवींद्र बोंद्रे, प्रारंभी गावंड तसेच परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्रीमती वंदना शिंदे यांनी प्रस्ताविकात उपक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. 'आत्मा' प्रकल्पांतर्गत मत्स्यबीज उपलब्ध




करून देण्यात आले असून लाभार्थी शेतकऱ्यांना मत्स्यपालनाबाबत प्रशिक्षणही देण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

जिल्हाधिकारी श्री. जावळे म्हणाले की, रायगड जिल्ह्याला122 किलोमीटरचा समुद्रकिनारा लाभला असून मत्स्य उत्पादन वाढविण्याची मोठी क्षमता आहे. जिल्ह्याचा मोठा भूभाग डोंगराळ व जंगलव्याप्त असल्याने पारंपरिक शेतीच्या विस्ताराला मर्यादा आहेत. त्यामुळे सागरी तसेच गोड्या पाण्यातील मत्स्यपालनाला चालना देऊन शेतकऱ्यांना उत्पन्नाचा शाश्वत पर्याय उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

या उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील 550 शेतकऱ्यांना मत्स्यबीजाचे वितरण करण्यात आले असून त्यांना पूर्वप्रशिक्षणही देण्यात आले आहे. आगामी काळात मत्स्यपालनाचे तंत्रज्ञान, खाद्य व्यवस्थापन, रोगनियंत्रण, उत्पादन व्यवस्थापन, मूल्यवर्धन, प्रक्रिया उद्योग आणि विपणन याबाबत तालुकानिहाय प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. तसेच शेततळे व बायोफ्लॉक तंत्रज्ञानालाही प्रोत्साहन दिले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले,मुंबई महानगर प्रदेश, जवाहरलाल नेहरू बंदर (जेएनपीटी) आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे मत्स्य उत्पादनासाठी मोठी बाजारपेठ उपलब्ध असून प्रक्रिया उद्योग व निर्यातीच्या माध्यमातून या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मितीची संधी असल्याचे त्यांनी नमूद केले.

आवश्यक भांडवल उपलब्ध नसल्यामुळे अनेक कोळी बांधवांना खासगी सावकारांकडून जादा व्याजदराने कर्ज घ्यावे लागते. ही परिस्थिती बदलण्यासाठी प्रमुख कोळीवाड्यांमध्ये बँकिंग सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न सुरू असून अलिबाग तालुक्यातील अक्षी येथे बँक ऑफ बडोदाची शाखा सुरू करण्यात आली आहे. भविष्यात जिल्ह्यातील इतर प्रमुख कोळीवाड्यांमध्येही अशा सुविधा उपलब्ध करून देण्याचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले.

रायगड जिल्ह्याचा 'वन डिस्ट्रिक्ट वन प्रॉडक्ट (ODOP)' म्हणून सागरी मत्स्य उत्पादनाचा समावेश करण्यात आला असून उत्पादनवाढ, मूल्यवर्धन आणि निर्यात वाढीसाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने कार्य करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी श्री. जावळे यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित लाभार्थी शेतकऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते मत्स्यबीजाचे वितरण करण्यात आले.

# श्रीवर्धन बोर्ली पंचतन येथे मुख्यमंत्री यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने रक्तदान शिबीर आयोजित

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :** श्रीवर्धन बोर्ली पंचतन येथे राज्याचे मुख्यमंत्री लोकप्रिय मा श्री देवेंद्र जी फडणवीस साहेब यांच्या वाढदिवसा निमित्त रक्तदान शिबीर आयोजित केले होते या वेळी रक्तदान हेच श्रेष्ठदान असून रक्तदान शिबीर पार पाडण्यासाठी





खूप प्रामानत मध्ये रक्तदान करणारे सर्व सामान्य नागरिक आनंदाने मोठया प्रमाणार रक्तदान करत असताना दिसत होते विशेष म्हणजे महिला आणि तरुण मुली देखील रक्तदान शिबिरात हाजर राहून रक्तदानाचे करतंव्य पार पाडत असताना दिसत होते रक्तदान केल्यानंतर प्रत्येक श्रीवर्धन तालुकध्यक्ष श्री असुतोष पाटील यांनी खूप मेहनत घेतली या वेळी विशेष म्हणजे श्रीवर्धन पंचायत समितीचे उप सभापती सौ पूजा प्रशांत शिंदे हजर होते भाजप कारकर्ते श्री प्रशांत शिंदे साहेब आणि सुशांत पाटील श्री रमेश पोटले साहेब प्रणय पेडणेकर यांनी मोलाचे कत्रव्य पार पाडले यावेळी रक्तदान करणाऱ्याला प्रमाण पत्रक देण्यात आले भाजप चे कार्यकर्ते खूप मोठया प्रमाणात उपस्तितीत होते प्रत्येक कार्यकर्त्याने देखील रक्तदान रांगेत उभे राहून आनंदाने मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने रक्तदान शिबिरास हाजर राहून रक्तदान केले

# लाखनीत जनकल्याण समाजोन्नती अन्याय निवारण समितीचे निवेदन; NEET पेपरफुटी प्रकरणी जबाबदारांवर कठोर कारवाईची मागणी

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे लाखनी, दि. 23 जुलै :** जनकल्याण समाजोन्नती अन्याय निवारण समिती, जिल्हा भंडारा यांच्या वतीने राष्ट्रपती महोदयांना तहसीलदार, लाखनी यांच्या मार्फत निवेदन सादर करून NEET पेपरफुटी प्रकरणातील जबाबदार केंद्रीय शिक्षणमंत्री, संबंधित अधिकारी व दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

निवेदनात म्हटले आहे की, दिल्लीतील विद्यार्थ्यांच्या आंदोलनादरम्यान पोलिसांकडून करण्यात आलेल्या लाठीमारामुळे अनेक विद्यार्थी जखमी झाले असून त्यात मुलींचाही समावेश आहे. विद्यार्थ्यांवर झालेल्या या कारवाईचा समितीने तीव्र निषेध नोंदविला आहे. शिक्षण व्यवस्थेवरील विद्यार्थ्यांचा विश्वास टिकवण्यासाठी दोषींवर निष्पक्ष आणि कठोर कारवाई करणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

**समितीने सरकारकडे पुढील प्रमुख मागण्या केल्या आहेत :**

आंदोलनात सहभागी असलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांची नावे व संख्या जाहीर करावी.

लाठीचार्जचे आदेश देणाऱ्या अधिकाऱ्याला तात्काळ बडतर्फ करावे.

जखमी विद्यार्थ्यांना आरोग्य उपचार व उपजीविकेसाठी प्रत्येकी ₹५० लाखांची आर्थिक मदत द्यावी.

भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी जबाबदार मंत्री किंवा प्रशासकीय अधिकाऱ्यांवर २४ तासांच्या आत कारवाई करण्याची व्यवस्था करावी.

सदर निवेदनाची प्रत सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश तसेच संसद भवन, नवी दिल्ली येथील प्रधान सचिव यांनाही पाठविण्यात आली आहे.

निवेदनावर जनकल्याण समाजोन्नती अन्याय निवारण समितीच्या पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या असून तहसील कार्यालयाने निवेदन स्वीकारल्याची नोंद करण्यात आली आहे.

# मुंबई पोलिसांच्या कथित धमकीचा व्हिडिओ व्हायरल; संबंधित पोलिस कर्मचारी निलंबित, चौकशी सुरू

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी:- मयुर धुरी (दादर मुंबई) :** आंदोलनात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना ड्रग्जच्या खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी दिल्याचा दावा करणारा एक व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला आहे. या व्हिडिओमध्ये एका पोलिस कर्मचाऱ्याने विद्यार्थ्यांना, पुन्हा इथे दिसलात तर खिशात ५० ग्रॅम पावडर (ड्रग्ज) टाकून प्रकरणात अडकवीन,अशी कथित धमकी पोलिस चालक सायन पोलिस



ठाणे येथील पवन सांगळे

दिल्याचे ऐकू येत असल्याचा दावा केला जात आहे.या व्हिडिओच्या आधारे काँग्रेसनेही सोशल मीडियावर पोस्ट करत, हे फक्त विद्यार्थ्यांना घाबरवण्याचा प्रयत्न नसून लोकशाहीने दिलेल्या आंदोलनाच्या अधिकारावर हल्ला आहे. अन्यायाविरोधात आवाज उठवणे हा गुन्हा नाही,अशी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.दरम्यान, व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर मुंबई पोलिसांनी तातडीने या प्रकरणाची दखल घेतली आहे. डीसीपी (ऑपरेशन्स) अकबर पठाण यांनी सांगितले की, व्हिडिओची सत्यता पडताळून पाहण्यासाठी चौकशी सुरू करण्यात आली आहे. चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित पोलिस कर्मचाऱ्याला निलंबित करण्यात आले असून, तो दोषी आढळल्यास त्याच्यावर नियमानुसार कठोर कारवाई केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

या घटनेमुळे आंदोलनादरम्यान पोलिसांच्या वर्तनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, चौकशी अहवालाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मुंबई पोलिसांनीही निष्पक्ष चौकशी करून सत्य समोर आणण्याचे आश्वासन दिले आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# पावसाच्या सुरुवातीलाच गाव झाले जलमय

## नालेसफाईच्या दाव्यांवर मोठे प्रश्नचिन्ह रस्त्यांवर पाणी साचल्याने ग्रामस्थ संतप्त

**दैनिक युवक आधार**

**भावेश धंधुकीया भंडारा जिल्हा प्रतिनिधी** : मान्सूनचा मोठा पाऊस अजून सुरूही झालेला नाही, मात्र तालुक्यातील ग्राम किन्ही येथे रस्त्यांवर पाण्याचे तलाव साचल्याचे विदारक चित्र समोर आले आहे. ग्रामपंचायतीकडून नालेसफाई केल्याचे दावे केले जात असले, तरी पहिल्याच तुटपुंज्या पावसात रस्त्यांवरून पाणी वाहू लागल्याने या कामाचा पुरता बोजवारा उडाल्याचे स्पष्ट झाले असून ग्रामस्थांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. गावातील मुख्य रस्त्यावर गढूळ पाणी साचल्याने रस्ता पूर्णपणे अदृश्य झाला आहे. यामुळे पादचारी, दुचाकीस्वार आणि लहान मुलांना पाण्यातूनच वाट काढावी लागत आहे. नाल्यांची योग्य सफाई न झाल्याने आणि पाण्याचा निचरा होण्यास वाव नसल्यामुळे पावसाचे पाणी थेट रस्त्यावर येऊन तुंबत आहे.



पावसामुळे गावातील नाल्या निकृष्ट पद्धतीने सफाई केल्यामुळे गावाची परिस्थिती तलावासारखी झाली आहे. रोडवरील पाणी साचल्यामुळे अनेकांच्या घरात पाणीच पाणी झाले. नाली सफाईचे कामे उत्कृष्टपणे करण्यात आले असते तर, कदाचित परिस्तिथी अशी नसती असे गावकाऱ्यांचे आरोप आहे.

रस्त्यावर साचलेल्या सांडपाण्यामिश्रित पावसामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून डासांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे. यामुळे गावात डेंग्यू, मलेरिया यांसारखे आजार पसरण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे. ग्रामपंचायतीने व संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांनी त्वरित किन्ही गावात प्रत्यक्ष पाहणी करून अडकलेले नाले मोकळे करावेत व रस्त्यावरील पाण्याचा तातडीने निचरा करावा, अशी मागणी ग्राम किन्ही येथील ग्रामस्थांकडून होत आहे.

> अजून पावसाचा जोर वाढायचा आहे. सुरुवातीलाच जर रस्त्यांची ही दुरवस्था असेल, तर ऐन पावसाळ्यात गावात पुरासारखी स्थिती निर्माण होईल. ग्रामपंचायत प्रशासनाने कागदी घोडे नाचवणे थांबवून प्रत्यक्ष काम करावे.
>
> कुणाल हुमणे ग्रामस्थ, किन्ही

# पनवेल तहसील सेतू कार्यालयात एजंटांचा सुळसुळाट; नागरिकांची लूट अन् अधिकाऱ्यांवर दबाव!

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : पनवेल तहसील कार्यालयातील 'सेतू' सुविधा केंद्र सध्या नागरिकांच्या मदतीसाठी की एजंटांचे खायचे दुकान, असा सवाल उपस्थित होत आहे. सेतू कार्यालयाच्या आवारात एजंटांचा प्रचंड सुळसुळाट वाढला असून, नागरिकांची उघडउघड अडवणूक आणि फसवणूक करून मलाई लाटण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत.




**अर्जदार गायब, एजंटच झाले 'मालक'!**

विविध दाखले, कागदपत्रे आणि शासकीय कामांसाठी येणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांना सरळ मार्गाने काम करणे कठीण झाले आहे. "आम्ही अधिकाऱ्यांच्या ओळखीचे आहोत, तुमचे काम एका दिवसात करून देतो," असे सांगून एजंट नागरिकांकडून हजारो रुपये उकळत आहेत.

विशेष म्हणजे, पुरवठा कार्यालयातील अधिकारी कर्मचारी यांना या बाबत विचारणा केली असता कर्मचारी नियमानुसार मूळ अर्जदाराची मागणी करतात, तेव्हा "अर्जदार आले नाहीत, आम्ही त्यांचेच काम घेऊन आलोय,आम्ही सामाजिक कामे करतो काम करूनच द्या!" अशी अरेरावी हे एजंट कार्यालयात करतात असे सांगितले आहे. ओळखीचा सुगावा देऊन आणि राजकीय किंवा इतर दबाव आणून कामे पदरात पाडून घेण्याचा सपाटा या एजंटांनी लावला आहे.

काम नसेल होत तर क्लायंट ला खिडकीत पाठवून गर्दी केली जाते. कागदपत्रांची पातळीची प्रक्रियेत चुकामूक झाल्याने बांगलादेशी रेशन कार्ड कसे बनतात ह्याचे उदाहरण दिसते. या बाबत पुरवठा कार्यालयात अनेकदा विवाद होताना दिसले आहे. या त्रासाबद्दल कार्यालयाने वरीष्ठना माहिती दिली असल्याचे समजते

शासकीय नियमांनुसार अत्यंत कमी शुल्कात होणाऱ्या कामांसाठी हे एजंट च्या संगनमताने महा ई सेवा केंद्र सामान्य नागरिकांची आर्थिक फसवणूक करत जनतेकडून अव्वाच्या सव्वा पैसे वसूल करत आहेत.

नवीन रेशनकार्ड आता शासकीय rcms संकेतस्थळा वरुन सुविधा मिळाली मात्र ह्याचा फायदा महा ई सेवा केंद्र घेत आहेत. ह्यावर कोणाचेही नियंत्रण नाही असे दिसते आहे.

> ग्रामीण भागातून किंवा दूरवरून येणाऱ्या अशिक्षित व गरजू नागरिकांना कार्यालयाच्या परिसरात उभे राहून फॉर्म भरण्यास मदत करतो सांगून नागरिकांना जाळ्यात ओढले जाते ऑनलाईन करण्यास ठराविक सेवा केंद्राकडे पाठवून तेथे 3 ते 4 हजार उकळले जात आहे. सर्वसामान्य अर्जदारांची मोठी आर्थिक फसवणूक होत असून, प्रशासनाच्या प्रतिमेलाही मोठा धक्का बसत आहे.'तहसील सेतू येथील रेशन कार्ड एजंट यांना प्रशासनाने यावर तात्काळ चाप लावावा.'
>
> — पीडित नागरिक

**प्रशासनाकडून कडक कारवाईची मागणी**

या प्रकारामुळे प्रामाणिकपणे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांवरही नाहक ताण येत असून, अरेरावी करणाऱ्या एजंटांवर प्रशासनाने आणि पोलिसांनी कडक कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

सेतू आवारात रोज दिसणारे एजंटांच्या वावरावर त्वरित बंदी घालावी.

फक्त मूळ अर्जदारांनाच प्रत्यक्ष उपस्थितीत प्रवेश द्यावा. महा इ सेवा केंद्राला शासनाने ऑनलाईन शुल्क मर्यादा जिल्हाधिकारी कडून ठरवून द्यावी.

दलालांची अरेरावी थांबवण्यासाठी सीसीटीव्ही (CCTV) आणि सुरक्षा रक्षक तैनात करावेत अशी मागणी नागरिकांकडून होत आहे

# अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त दर्यापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत अभिवादन

## प्रतिमेस पुष्पहार अर्पण; कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांची उत्स्फूर्त उपस्थिती

**दैनिक युवक आधार**

**दर्यापूर ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी** : महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते मा. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त दर्यापूर कृषी उत्पन्न बाजार समिती येथे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मा. सुनील पाटील गावंडे होते. त्यांच्या प्रमुख उपस्थितीत हा अभिवादन सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी बाजार समितीचे संचालक, माजी संचालक, व्यापारी, शेतकरी, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी अजितदादा पवार यांच्या राज्याच्या विकासासाठी केलेल्या विविध कामांचा गौरवपूर्ण उल्लेख करत त्यांच्या नेतृत्वाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमात उपस्थितांनी अजितदादा पवार यांना निरोगी व दीर्घायुष्य लाभावे, अशी सदिच्छा व्यक्त केली. शेवटी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

**ठळक मुद्दे**

अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

दर्यापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत कार्यक्रम

प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली

सभापती सुनील पाटील गावंडे यांची प्रमुख उपस्थिती

पदाधिकारी, व्यापारी व कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त सहभाग

# प्रेरणादायी मार्गदर्शक कॉ. यादवराव गायकवाड यांना स्मृतिदिना निमित्त क्रांतिकारी अभिवादन

**दैनिक युवक आधार**

**श्रीक्षेत्र माहुर प्रतिनिधी: सय्यद ईसा** : मार्क्सवादी व आंबेडकरवादी चळवळीतील जेष्ठ कार्यकर्ते तथा शेवटच्या श्वासापर्यंत कम्युनिस्ट चळवळीत एकनिष्ठ असलेले दिवंगत यादवराव गोविंदराव गायकवाड यांचा स्मृतिदिन २२ जुलै रोजी माकप कार्यालयात साजरा करण्यात आला.मुळचे विदर्भातील रहिवासी तथा माहूर तालुक्यातील वझरा शेख फरीद येथे स्थायिक असलेले आणि नंतर नांदेड येथे स्थायिक झालेले कॉ.यादवराव गायकवाड यांच्या प्रेरणेने अनेक कार्यकर्ते घडले व आज पुढारी म्हणून वेगवेगळ्या संघटनांचे पदाधिकारी आहेत.शेतकरी कुटुंबातील यादवराव गायकवाड यांनी अनेक आंदोलनात प्रत्यक्षात सहभाग घेतला असून ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि कार्ल मार्क्स यांच्या विचारावर चालणाऱ्या संघटनाचे अभ्यासक आणि कार्यकर्ते होते.त्यांचा मुलगा कॉ.गंगाधर गायकवाड यांस माहूर शेतकरी आंदोलनात हद्दपार केल्यामुळे ते सन २००५ मध्ये नांदेड येथे स्थायिक झाले आणि नांदेड येथे देखील त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनी जनहितार्थ अनेक लक्षवेधी आणि यशस्वी आंदोलने केली.त्यांच्या मुलावर अनेक आंदोलनात वेगवेगळे गंभीर गुन्हे दाखल झाले असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल वाईट प्रतिक्रिया देणाऱ्या शालिनी पाटील निषेध आंदोलनात गंभीर गुन्हे नांदेड मध्ये दाखल असून त्यांच्यावर सन २००६ पासून जिल्हा न्यायालयात खटला अजूनही सुरु आहे.त्यांच्या कुटुंबातील मुलगा, सून, नातू, मुली, पुतणे, पुतण्या असे अनेक जन आज मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षात व पक्षाच्या विविध जन संघटना मध्ये सक्रिय कार्यकर्ते व पुढारी आहेत.त्यांना स्मृतिदिना निमित्ताने माकप कार्यालयात अभिवादन करण्यात आले व आदरांजली वाहण्यात आली.यावेळी कॉ.जयराज गायकवाड,कॉ.लता गायकवाड,कॉ. सुंदरबाई वाहूळकर,कॉ.प्रयागबाई लोखंडे, कॉ. मंगेश वट्टेवाड, कॉ. इंदिराबाई टेंबरे, कॉ. चंद्रकांत लोखंडे, कॉ.साहेबराव गजभारे,कॉ. दिगंबर टेंबरे,कॉ.विश्वजीत गजभारे आदींची उपस्थिती होती.



# नेता गेला... पण आठवणी अमर राहाव्यात" : दिव्यांग भागवत पाटील यांच्याकडून अजितदादांच्या प्रतिमांचे भेटवस्तू

**दैनिक युवक आधार**

**सणसर : विकास क्षत्रिय** : नेत्यावरील प्रेम हे केवळ राजकीय निष्ठेपुरते मर्यादित नसते,तर ते भावनिक नात्यातही रूपांतरित होते.याच भावनेतून इंदापूर तालुक्यातील सणसर येथील दिव्यांग युवक दिगंबर उर्फ भागवत निंबाळकर(पाटील) यांनी स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त गावातील प्रमुख संस्थांना त्यांच्या प्रतिमा भेट देऊन अनोख्या पद्धतीने आदरांजली वाहिली.यावेळी सणसर विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी,पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा सणसर तसेच ग्रामपंचायत सणसर या प्रमुख कार्यालयांना स्व. अजितदादा पवार यांच्या प्रतिमा भेट देण्यात आल्या. या उपक्रमामागे कोणताही दिखाऊपणा नसून,आपल्या लाडक्या नेत्याच्या आठवणी कायम जिवंत राहाव्यात,हीच भावना असल्याचे भागवत आण्णा पाटील यांनी सांगितले.स्व.अजितदादा पवार हे महाराष्ट्राच्या राजकारणातील स्पष्टवक्ते, कार्यतत्पर आणि सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या भावना जपणारे नेतृत्व म्हणून ओळखले जात होते.कार्यकर्त्यांना संधी देणे,त्यांच्यावर विश्वास ठेवणे आणि अडचणीच्या काळात त्यांच्या पाठीशी उभे राहणे,हा त्यांचा स्वभाव अनेकांना प्रेरणा देणारा ठरला.त्यांच्या याच कार्यशैलीमुळे भागवत आण्णा पाटील यांच्या मनात त्यांच्याविषयी विशेष जिव्हाळा आणि आदर निर्माण झाला होता."आज आपला नेता आपल्यात नसला,तरी त्यांची विचारसरणी, कार्यपद्धती आणि प्रेरणा कायम स्मरणात राहावी. गावातील सार्वजनिक कार्यालयांमध्ये त्यांच्या प्रतिमा पाहून पुढील पिढीलाही त्यांच्या कार्याची प्रेरणा मिळेल,"अशी भावना भागवत आण्णा पाटील यांनी व्यक्त केली. भागवत आण्णा पाटील हे उच्चशिक्षित असून त्यांनी बी.एस्सी. (ॲग्री.) पर्यंत शिक्षण घेतले आहे.त्यांनी सणसर विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे माजी चेअरमन म्हणूनही उल्लेखनीय काम केले असून,त्यांच्या कार्यकाळात संस्थेच्या हिताचे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.समाजाभिमुख दृष्टिकोन,शेतकरी हिताची भूमिका आणि युवकांना सातत्याने योग्य मार्गदर्शन करण्याची त्यांची कार्यशैली आजही कौतुकास्पद मानली जाते.स्व.अजितदादा पवार यांच्यावरील निस्सीम प्रेम आणि कृतज्ञतेच्या भावनेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे सणसर परिसरातून कौतुक होत आहे.यावेळी इंदापूर पंचायत समितीचे माजी सभापती तुकाराम काळे सरपंच यशवंत पाटील विस्तार अधिकारी शेख साहेब माजी सरपंच पार्थ निंबाळकर माजी चेअरमन सुधीर निंबाळकर अमोल भोईटे माजी ग्रामपंचायत सदस्य शरद कांबळे ग्रामसेवक सचिन पवार आदी ग्रामस्थ उपस्थित होते.



# NEET पेपरफुटीच्या निषेधार्थ अमरावतीतील वंचित बहुजन आघाडीकडून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन; दोषींवर कारवाईची मागणी - राहुल मेश्राम



**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : NEET पेपरफुटी प्रकरणी दिल्लीच्या जंतर-मंतर येथे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्जच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडी, अमरावती जिल्हा तर्फे आज जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. या प्रकरणातील दोषी पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्यावर कारवाई करून त्यांना निलंबित करावे अशी मागणी यावेळी करण्यात आली.

**काय आहे निवेदनात?**

वंचित बहुजन आघाडीचे अमरावती जिल्हाध्यक्ष `पूर्व` *राहुल मेश्राम* यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, NEET पेपरफुटी विरोधात दिल्लीतील जंतर-मंतर येथे विद्यार्थ्यांनी शांततेत आंदोलन सुरू केले होते. मात्र शासन आणि पोलीस विभागाने त्या आंदोलनाला हिंसक वळण देऊन विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज केला. यामुळे विद्यार्थ्यांवर अन्याय झाला आहे.

विद्यार्थ्यांच्या भविष्याच्या दृष्टीकोनातून राष्ट्रपतींनी या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन दोषींवर तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीने केली आहे.

**महाराष्ट्र बंदला मिळाला होता पाठिंबा**

या अन्यायाच्या निषेधार्थ श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर साहेबांच्या हाकेवरून वंचित बहुजन आघाडी व समविचारिक पक्षांनी 23 जुलै 2026 रोजी संपूर्ण महाराष्ट्र बंदचे आवाहन केले होते. अमरावती जिल्ह्यातही हा बंद यशस्वीपणे पार पाडून न्यायाच्या मागणीसाठी आवाज उठवण्यात आला, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

**पुढील भूमिका**

राहुल मेश्राम यांनी सांगितले की, जोपर्यंत विद्यार्थ्यांना न्याय मिळत नाही आणि दोषींवर कारवाई होत नाही तोपर्यंत वंचित बहुजन आघाडी आंदोलनाच्या माध्यमातून पाठपुरावा करत राहील.

निवेदन देताना वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रजेगांव येथे लोकनेते स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त भव्य मोफत आरोग्य शिबिर

**दैनिक युवक आधार**

**गोंदिया सचिन बन्सोड जिल्हा प्रतिनिधी** : आरोग्य उपकेंद्र रजेगांव, ता.गोंदिया येथे जनसेवा सप्ताहानिमित्त लोकनेते स्व.अजितदादा पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने भव्य मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन खासदार श्री प्रफुल पटेलजी व खासदार श्री राजेंद्र जैन यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले.



या आरोग्य शिबिरामध्ये यांनी नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. विविध आजारांचे निदान, आवश्यक वैद्यकीय सल्ला तसेच औषधांचे मोफत वितरण करण्यात आले. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या डॉक्टर च्या चम्मुचे सहकार्य लाभले यात अधिष्ठाता डॉ कुसुमाकर घोरपडे, शल्य चिकित्सक डॉ पुरुषोत्तम पटले, डॉ संजय माहुले, डॉ आनित आटे, डॉ गुरुप्रकाश खोब्रागडे, डॉ रणजित खरोले, डॉ आरुश मुंन्डे, डॉ मयूर मेश्राम, डॉ मोहित गजभिये, डॉ सुप्रिया बोरकर व वैद्यकीय कर्मचारी यांनी सहकार्य केले. आरोग्य शिबिरात नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शिबिराचा लाभ घेतला.

यावेळी सर्वश्री केतन तूरकर, अखिलेश सेठ सहित राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, वैद्यकीय अधिकारी, डॉक्टर तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होत

# बच्चू भाऊ कडू यांच्या प्रहार दिव्यांग क्रांती संस्थेची यवतमाळ जिल्ह्यातील पहिली शाखा लोहरा (ई.) येथे स्थापन

**दैनिक युवक आधार**

**उमरखेड टाळयजा प्रतिनिधी राजू गायकवाड (मोहदरी)** : एक हक्क, एक लढा, संपूर्ण सन्मान आमचा ध्यास" हे ब्रीदवाक्य घेऊन दिव्यांग, वंचित व सर्वसामान्य नागरिकांच्या हक्कांसाठी सातत्याने संघर्ष करणारे प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष तथा आमदार बच्चू भाऊ कडू यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या प्रहार दिव्यांग क्रांती संस्थेची यवतमाळ जिल्ह्यातील पहिली शाखा पुसद तालुक्यातील लोहरा (ई.) येथे उत्साहपूर्ण वातावरणात स्थापन करण्यात आली. दिव्यांग बांधवांना न्याय, सन्मान व शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी तसेच त्यांना संघटित करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

लोहरा (ई.) येथे प्रहार दिव्यांग क्रांती संस्थेच्या यवतमाळ जिल्ह्यातील पहिल्या शाखेच्या नामफलकाचे अनावरण व शाखेचे उदघाटन पुसद तालुका अध्यक्ष श्री. संजय गोदमले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पुसद तालुका संपर्क प्रमुख श्री. राजकुमार मनवर, ग्रामीण उपाध्यक्ष श्री. मांगीलाल राठोड, प्रहार सेवक श्री. शालिपुत्र ढोले तसेच सर्कल अध्यक्ष श्री. प्रेम मेंढे यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी लोहरा (ई.) शाखेची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून विशाल कांबळे यांची सर्कल सचिव तथा शाखाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. तसेच इंदल राठोड यांची शाखा उपाध्यक्ष, बाळू चिरंगे यांची शाखा सचिव आणि युवराज राठोड यांची शाखा संपर्क प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली.



शाखेच्या सदस्यपदी अनिल राठोड, विलास चव्हाण, भिवा भिसे, मोईद्दीन बोडुंगे, संदीप काळे, नागोराव गुव्हाडे, अतुल बोरपल्ले, लक्ष्मण चव्हाण, केशव चव्हाण, सुरज राठोड, सखाराम जाधव, नामदेव चिरंगे, संतोष राठोड, निर्गुण चव्हाण, यशोदाबाई तडसे, गणेश चव्हाण आणि सविता राठोड यांची निवड करण्यात आली.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून तंटामुक्ती समिती अध्यक्ष श्री. विजय राठोड, सामाजिक कार्यकर्ते श्री. सुनिल कांबळे, श्री. दत्तराव नाईक, श्री. हरभाऊ चव्हाण, श्री. संभाजी भिसे, श्री. शेषराव चव्हाण, श्री. उकंडराव राठोड आणि श्री. शंकर राठोड जानू सिंग राठोड शाखा अध्यक्ष माणिक डोह माधव धोत्रे उपअध्यक्ष माणिकडोह उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी प्रहार दिव्यांग क्रांती संस्थेच्या माध्यमातून दिव्यांग, वंचित आणि गरजू नागरिकांच्या प्रश्नांसाठी प्रभावीपणे कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला. तसेच संस्थेचे ब्रीदवाक्य "एक हक्क, एक लढा, संपूर्ण सन्मान आमचा ध्यास" प्रत्यक्षात उतरविण्यासाठी सर्वांनी एकजुटीने कार्य करण्याचे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमास ग्रामस्थ, कार्यकर्ते आणि नागरिकांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन व आयोजन सर्कल सचिव तथा शाखाध्यक्ष विशाल कांबळे यांनी केले. त्यांच्या पुढाकारामुळे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

## दिल्लीतील विद्यार्थी आंदोलनावरील कथित लाठीचार्जच्या निषेधार्थ 'मुदखेड बंद' यशस्वी; व्यापारी, नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**मुदखेड प्रतिनिधी : प्रकाश गवारे** : दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीचार्ज व मारहाणीच्या निषेधार्थ भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल आणि वंचित बहुजन आघाडी यांच्या संयुक्त वतीने गुरुवारी दि. २३ पुकारण्यात आलेल्या 'मुदखेड बंद'ला शहरातील व्यापारी, व्यावसायिक, सामाजिक संघटना, नागरिक आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शहरातील मुख्य बाजारपेठेसह बहुतांश व्यावसायिक प्रतिष्ठाने दिवसभर स्वयंस्फूर्तीने बंद राहिल्याने बंद यशस्वी ठरल्याचे आयोजकांनी सांगितले.

सकाळपासूनच शहरातील मुख्य बाजारपेठ, किरकोळ दुकाने व विविध आस्थापना बंद असल्याचे चित्र पाहायला मिळाले. व्यापाऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांना पाठिंबा देत स्वखुशीने आपले व्यवहार बंद ठेवले. शहरात दिवसभर शांततेचे वातावरण कायम होते.

यावेळी भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल आणि वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की,



विद्यार्थी हे देशाचे वर्तमान आणि भविष्य असून शांततापूर्ण आंदोलन करणे हा प्रत्येक नागरिकाचा घटनात्मक अधिकार आहे. अशा आंदोलनावर बळाचा वापर होणे ही लोकशाहीसाठी चिंतेची बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांवरील कथित लाठीचार्जची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणीही त्यांनी केली.

बंददरम्यान विविध संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शहरात फिरून व्यापारी व नागरिकांशी संवाद साधत आंदोलनामागील भूमिका स्पष्ट केली. विद्यार्थ्यांवरील अन्यायाचा निषेध आणि लोकशाही मूल्यांचे संरक्षण हा या बंदचा प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. व्यापारी वर्गानेही या भूमिकेला सकारात्मक प्रतिसाद देत विद्यार्थ्यांच्या न्यायाच्या लढ्याला पाठिंबा दर्शविला.

बंदच्या पार्श्वभूमीवर शहरात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस प्रशासनाने आवश्यक बंदोबस्त ठेवला होता. दिवसभर कोणताही अनुचित प्रकार घडला नसून बंद शांततेत व शिस्तबद्ध वातावरणात पार पडला.

दरम्यान, भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल आणि वंचित बहुजन आघाडी, मुदखेड यांच्या वतीने बंदला सहकार्य करणाऱ्या सर्व व्यापारी, व्यावसायिक, सामाजिक संघटना, नागरिक आणि विद्यार्थ्यांचे आभार मानण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांच्या न्यायासाठीचा लढा संविधानिक व लोकशाही मार्गाने पुढेही सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

## सांस्कृतिक कार्य संचालनालया तर्फे २४ जुलै रोजी

### अकोला येथे विशेष भक्तिसंगीत कार्यक्रम !! गजर माऊलीचा कार्यक्रमातून विठ्ठलभक्तीचा सुरेल जागर !!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे प्रतिनिधी** : महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने आषाढी एकादशीनिमित्त 'गजर माऊलीचा ' या विशेष भक्तिसंगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार, दि. २४ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता अकोला येथील प्रमिलाताई ओक हॉल येथे हा कार्यक्रम रंगणार आहे.

वारकरी संप्रदायाची अखंड भक्तिपरंपरा, संतांच्या अभंगांचे आध्यात्मिक चिंतन आणि विठ्ठलनामाच्या अखंड गजरातून भक्तिभाव जागविणारा हा कार्यक्रम रसिकांसाठी एक आगळावेगळा सांस्कृतिक अनुभव ठरणार आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ आदी संतांच्या विचारांचा आणि विठ्ठलभक्तीच्या समृद्ध वारशाचा सुरेल आविष्कार या



कार्यक्रमातून सादर केला जाणार आहे.कार्यक्रमात प्रसिद्ध श्री विठ्ठलाचे निशिंह भक्त अनेकांना व्यसनमुक्त करणारे कीर्तनकार प्रवचनकार संतोष महाराज पिसे यांच्या पावन वाणीतून

गायनाचार्य हरिश्चंद्र पिसे, भानुदास धोटे, किशोर कावर गीता ताई पिसे, रश्मी पवार,विजय राऊत तबला,गावंडे महाराज शेगाव मृदंग,राजीव जोशी बासरी,लोकेश अवचार,कीबोर्ड,टाळ वादन,भक्तराज गावंडे,सुभाष बेले,राजेश वरुडकर,श्रीकृष्ण झटाले, संचलन डॉ.प्रदीप जी अवचार,गणेशजी बोरकर,धनंजय मिश्रा प्रस्तावना कल्याणी ताई पवित्रकार यांच्या सुमधुर आवाजातून भक्तिगीते, अभंग आणि विठ्ठलभक्तीपर रचनांचे सादरीकरण करण्यात येणार आह. यांच्या सुरेल स्वरांतून अभंग, भक्तिगीते आणि विठ्ठलनामाचा गजर अनुभवता येणार आहे.आषाढी वारी ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेचे प्रतीक मानली जाते. वारकरी संप्रदायाने समता, भक्ती, मानवता आणि समाजप्रबोधनाचा संदेश शतकानुशतके जपला आहे. त्या परंपरेचे संगीतबद्ध आणि भावपूर्ण दर्शन या कार्यक्रमातून घडणार असून, सर्व वयोगटातील रसिकांना विठ्ठलभक्तीचा आनंद अनुभवण्याची संधी मिळणार आहे.

हा सांस्कृतिक उपक्रम सांस्कृतिक कार्य, माहिती तंत्रज्ञान, इलेक्ट्रॉनिक्स व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला आहे. राज्याच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे जतन, संवर्धन आणि प्रसार करण्यासाठी सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत अशा दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रमांचे सातत्याने आयोजन करण्यात येत आहे.या कार्यक्रमास अकोला व परिसरातील वारकरी, संगीतप्रेमी, कला रसिक तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या भक्तिमय सांस्कृतिक सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्रीराम पांडे यांनी केले आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपा पार्कसाईट मंडळ आयोजित रक्तदान व कर्करोग तपासणी शिबीर संपन्न

**दैनिक युवक आधार**

**घाटकोपर,(केतन भोज)** : महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार राम कदम तसेच ईशान्य मुंबई जिल्हा उपाध्यक्ष अनिल भाई निर्मळे यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पक्ष पार्कसाईट मंडळ,वॉर्ड क्र.१२३ व १२४ यांच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत रक्तदान शिबिर तसेच बहिण लाडकी मुख्यमंत्र्यांची घेऊ काळजी तिच्या आरोग्याची या उपक्रमांतर्गत महिलांसाठी मोफत कर्करोग तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते.दिवसभर मुसळधार पाऊस सुरू असूनही परिसरातील नागरिक,महिलांनी मोठ्या उत्साहाने या शिबिरात सहभाग घेतला. अनेक रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून समाजाप्रती आपली जबाबदारी पार पाडली,तर महिलांनी कर्करोग तपासणीचा लाभ घेत आरोग्याविषयी जागरूकतेचा संदेश दिला. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पार्कसाईट मंडळ अध्यक्ष संतोष गांजले,वॉर्ड



अध्यक्ष महेश गुप्ता,दत्ता सोनावणे यांनी सर्व पदाधिकारी,कार्यकर्ते,वैद्यकीय पथक,स्वयंसेवक तसेच उपस्थित नागरिकांचे मनःपूर्वक आभार मानले.समाजोपयोगी उपक्रमांमधून जनसेवेची परंपरा पुढेही कायम ठेवण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.हा उपक्रम घाटकोपर पश्चिम विधानसभा क्षेत्रात सामाजिक आरोग्य आणि जनजागृतीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## "आमचा वेळ वाया घालऊ नका"!.... भारताचे सरन्यायाधीश सूर्य कांत यांची टिपण्णी

**दैनिक युवक आधार**

**ता. कर्जत - वैभव गायकवाड** : NEET परीक्षेच्या प्रश्नपत्रिकांच्या झालेल्या पेपरफुटीमुळे गेल्या २२ दिवसांपासून दिल्लीच्या जंतर मंतर मैदानात सोनम वांगचूक आणि कोक्रोच जनता पार्टीचे मुख्य अभिजित दीपके व लाखो विद्यार्थी तसेच अनेक जागरूक नागरिक उपोषणाला बसले आहेत. यांची प्रमुख मागणी आहे ती झालेल्या पेपरफुटी मुळे लाखो विद्यार्थ्यांचे नुकसान झाले असून अनेक विद्यार्थ्यांनी आपले जीवन संपविले आहे त्यामुळे केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेण्यात यावा.२० तारखेला केंद्र सरकार व स्थानिक दिल्ली राज्यसरकारने जबरदस्तीने सोनम वांगचूक यांना ताब्यात घेऊन उपोषण तोडण्यासाठी बळाचा वापर करून हॉस्पिटल मध्ये दाखल केले. परंतु याचा परिणाम म्हणून, आंदोलनकर्ते विद्यार्थ्यांमध्ये सरकार विरुद्ध आणखी रोष उफाळून आला. सरकार विरोधात अधिक घोषणाबाजी सुरु झाली. परिणामस्वरूप पोलीस प्रशासनाद्वारे आंदोलनकर्त्यांवर जबर लाठी चार्ज करण्यात आला. यामध्ये अनेक विद्यार्थी गंभीररित्या जखमी झाले. अनेक विद्यार्थिनींना ओढत नेण्यात आले. प्रथमदर्शनींच्या म्हणण्यानुसार, अनेक जण जे पोलिसांच्या सोबत विद्यार्थ्यांवर लाठी-काठी चालविणारे मुळात पोलीस नव्हतेच, MSF चे जवान नव्हते, सुरक्षा दलातील रक्षक नव्हते, SRPF चे जवान सुद्धा नव्हते. ते आंदोलन चिघळण्यासाठी आणि आंदोलनकर्त्यांना मारण्यासाठी मागविण्यात आलेले गुंड प्रवृत्तीचे लोकं होते असे म्हणणे आहे.या सर्व प्रकरणाची दखल केंद्र सरकार व राज्य सरकार द्वारे घेतली जात नसल्याने आंदोलनाकर्त्यांद्वारे माननिय सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली. या




याचिकेमध्ये झालेल्या अमानुष मारहाणीचा निषेध व जे कर्मचारी स्वतःला पोलीस म्हणून लाठीचार्ज मध्ये सामील होते, त्यांची चौकशी करून त्यांच्यावर व दिल्ली पोलीस प्रशासनावर कडक कारवाई करण्यात यावी अशी मागणी होती. त्याकरिता सर्वोच्च न्यायालयात काही चित्रफिती (video footage) दाखविण्याची परवानगी मागितली असता, सर्वोच्च न्यायालयाचे सर्वोच्च न्यायाधीश सूर्य कांत यांनी टिपण्णी करताना सांगितले, "आमचा वेळ वाया घालवू नका, आणि तुमचाही वेळ वाया घालवू नका. पोलिसांच्या अतिरेकाचा video पाहण्यासाठी आमच्याकडे वेळ नाही."हे वाक्य भारताच्या सर्वोच्च न्यायाधीशाचे आहे. त्यांना हा विषय इतका गंभीर वाटत नाही. याकरिता त्यांना वेळ नाही. मग सर्वोच्च न्यायालयाला अशी कोणती महत्वाची कामे असावीत? असा प्रश्न पडतो.देशभरात चाललेल्या पक्ष चोरीचा विषय गंभीर नाही, परीक्षेचे पेपर फुटतात तो विषय गंभीर नाही, भ्रष्टाचार हा विषय गंभीर नाही, फ्रीडम ऑफ स्पीच अधिकार वापरल्यास कारवाई होते हा विषयदेखील गंभीर नाही. मग, माननिय न्यायाधीश सूर्य कांत यांच्या मते कोणता विषय गंभीर आहे एकदा सर्व जनतेस कळवा तरी.जर न्याय व्यवस्थेकडे लोकांच्या प्रश्नांसाठी वेळ नसेल, तर भारतातील सबंध जनतेने न्याय कोणाकडे मागायचा हा सर्वात मोठा प्रश्न निर्माण होतो. न्याय व्यवस्थेमध्ये अश्या प्रकारचे न्यायाधीश विराजमान असतील आणि प्रशासनामध्ये जनतेलाचं ठोकून काढणारे अधिकारी आणि कर्मचारी असतील तर भारताचा सुद्धा बंगाल आणि नेपाळ होण्यास वेळ लागणार नाही.

## बीएचएमएस डॉक्टरांना रोजगार व आर्थिक बळ द्या; डॉ. रश्मी जीवन जाधव यांची राज्य सरकारकडे मागणी

**दैनिक युवक आधार**

**नासिकेत पानसरे मुंबई / प्रतिनिधी** : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) च्या मुंबई प्रदेश महिला आघाडीच्या उपाध्यक्षा डॉ. रश्मी जीवन जाधव (BHMS) यांनी राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांना भेटून त्यांना निवेदन देऊन बीएचएमएस डॉक्टरांना अधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याबरोबरच स्वयंरोजगारासाठी आर्थिक सहाय्य देण्याची मागणी केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, बीएचएमएस डॉक्टर हे राज्याच्या आरोग्य व्यवस्थेतील महत्त्वाचा घटक असून ग्रामीण व शहरी भागात आरोग्यसेवा पोहोचविण्यात त्यांचे मोठे योगदान आहे. मात्र, मर्यादित रोजगाराच्या संधी आणि आर्थिक अडचणींमुळे अनेक डॉक्टरांना स्वतःचा




व्यवसाय सुरू करण्यात अडथळे येत आहेत.

यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रे (PHC), ग्रामीण रुग्णालये, शहरी आरोग्य केंद्रे, राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) तसेच इतर शासकीय आरोग्य सेवांमध्ये बीएचएमएस डॉक्टरांना अधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच, बीएचएमएस डॉक्टरांना स्वतःचे क्लिनिक किंवा आरोग्य सेवा केंद्र सुरू करण्यासाठी कमी व्याजदराचे कर्ज, शासकीय अनुदान व इतर आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्याची मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.या प्रसंगी डॉ.निला गुप्ता, सिनियर इंजिनिअर नितीन रणखांबे आदी मान्यवर उपस्थित होते

या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेऊन योग्य ती कार्यवाही करावी, अशी अपेक्षा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) च्या डॉ.रश्मी जीवन जाधव यांनी व्यक्त केली आहे.

## जगदगुरु तुकाराम महाराज पालखी सोहळयानिमित्त जागृत ग्राहक प्रबोधन व सेवा दिंडी उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**सणसर :- विकास क्षत्रिय** : जगदगुरु संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्यात जागृत ग्राहकराजा ग्राहक संघटना, इंदापूर तालुका यांच्या वतीने "जागृत ग्राहक प्रबोधन व सेवा दिंडी"चे आयोजन करण्यात आले.

भवानीनगर,सणसर,बेलवाडी व इंदापूर येथे आयोजित करण्यात आलेल्या या प्रबोधन कार्यक्रमांमध्ये नागरिकांना ग्राहक हक्क व संरक्षणाबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

यामध्ये ग्राहकांची फसवणूक टाळण्याचे उपाय, सायबर गुन्ह्यांपासून सुरक्षित राहण्याचे मार्ग, बनावट बियाणे व अन्नभेसळ याबाबत तक्रार कशी करावी,एस.टी.प्रवाशांचे अधिकार,शासनाच्या विविध



जनकल्याणकारी योजनांची माहिती, तसेच वस्तू व सेवा निवडण्याचा ग्राहकांचा अधिकार यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.या उपक्रमात दिलीप निंबाळकर (अध्यक्ष,जागृत ग्राहकराजा ग्राहक संघटना,पुणे जिल्हा तथा सदस्य, ग्राहक संरक्षण परिषद, पुणे जिल्हा),शत्रुघ्न घाडगे (अध्यक्ष, जागृत ग्राहकराजा ग्राहक संघटना, इंदापूर तालुका),दिलीप दुपारगुडे (वजन-माप प्रमुख, इंदापूर तालुका),तानाजी खैरे (ऊर्जा प्रमुख, इंदापूर तालुका) आणि रवी खरात (उपाध्यक्ष) यांनी उपस्थित राहून ग्राहक जनजागृतीचे महत्त्व पटवून दिले.ग्राहक जागरूक असेल तरच त्याची फसवणूक टळू शकते,या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या प्रबोधन व सेवा दिंडीला वारकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# वचनपूर्तीचा आणखी एक ठोस टप्पा ! मिरा रोडला स्वतंत्र शिधावाटप कार्यालयासाठी प्रशासकीय मंजुरी

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी - बाळकृष्ण परब.**

**मिरा - भाईंदर, ठाणे** : मिरा रोड परिसरातील नागरिकांची अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली स्वतंत्र शिधावाटप कार्यालयाची (रेशनिंग ऑफिस) मागणी अखेर मार्गी लागली आहे. मिरा रोड येथे स्वतंत्र शिधावाटप कार्यालय सुरू करण्यासाठी प्रशासकीय मंजुरी मिळाल्याने परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. या निर्णयामुळे मिरा रोड आणि परिसरातील नागरिकांना शिधावाटप विभागाशी संबंधित विविध कामांसाठी भाईंदरच्या कार्यालयामध्ये जाण्याची आवश्यकता कमी होणार असून, स्थानिक पातळीवरच शासकीय सेवा उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

मिरा रोड परिसराची गेल्या काही वर्षांत झपाट्याने लोकसंख्या वाढली आहे. मोठ्या प्रमाणात नागरीकरण झाल्यामुळे नागरिकांच्या मूलभूत सुविधांवरील ताणही वाढला आहे. त्यातच शिधावाटप विभागाशी संबंधित कामांसाठी स्वतंत्र कार्यालय नसल्याने नागरिकांना विविध शासकीय प्रक्रियांसाठी इतर ठिकाणी जावे लागत होते. रेशन कार्डमधील नाव दुरुस्ती, नवीन नाव समाविष्ट करणे, नाव कमी करणे, पत्ता बदल, कुटुंबातील सदस्यांची माहिती अद्ययावत करणे तसेच शिधावाटपाशी संबंधित इतर प्रशासकीय कामांसाठी नागरिकांना होणारी गैरसोय दूर करण्याची मागणी सातत्याने केली जात होती. नागरिकांची ही मागणी लक्षात घेऊन स्वतंत्र शिधावाटप कार्यालयासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. अखेर या पाठपुराव्याला यश मिळाले असून, मिरा रोडसाठी स्वतंत्र शिधावाटप कार्यालयाला प्रशासकीय मंजुरी मिळाल्याचे जाहीर करण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांना आता आपल्या परिसरातच संबंधित विभागाच्या सेवा मिळण्याची अपेक्षा निर्माण झाली आहे.

या निर्णयाचे स्वागत करताना नरेंद्र मेहता यांनी हा निर्णय म्हणजे नागरिकांच्या अनेक वर्षांच्या मागणीची पूर्तता असल्याचे म्हटले आहे. नागरिकांना अधिक सुलभ, जलद आणि प्रभावी शासकीय सेवा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी करण्यात आलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

या महत्त्वपूर्ण निर्णयासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच संबंधित मंत्रिमंडळातील सर्व सदस्यांचे आभार व्यक्त करण्यात आले आहेत. नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित प्रश्न सोडवण्यासाठी आणि परिसराच्या विकासासाठी शासन स्तरावर सकारात्मक निर्णय घेण्यात आल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

मिरा रोडमध्ये स्वतंत्र शिधावाटप कार्यालय सुरू झाल्यानंतर परिसरातील नागरिकांना शिधावाटप विभागाशी संबंधित कामांसाठी होणारी धावपळ कमी होण्याची शक्यता आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना या कार्यालयाचा मोठा फायदा होऊ शकतो. स्थानिक पातळीवर सेवा उपलब्ध झाल्यास नागरिकांचा वेळ आणि प्रवासाचा खर्च वाचण्यास मदत होईल.

## नागरिकांच्या अनेक वर्षांच्या मागणीला अखेर यश; शिधावाटप विभागाच्या सेवा अधिक सुलभ आणि जलद होण्याची अपेक्षा

याशिवाय, नागरिकांच्या तक्रारी आणि अर्जांवर अधिक जलद कार्यवाही होण्याची अपेक्षाही व्यक्त केली जात आहे. शिधावाटप विभागाच्या विविध सेवांसाठी नागरिकांना एका ठिकाणी मार्गदर्शन आणि प्रशासकीय सुविधा उपलब्ध झाल्यास सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील सेवा अधिक प्रभावी होण्यास मदत होऊ शकते.

मिरा रोड परिसरात गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात गृहप्रकल्प आणि निवासी वसाहती विकसित झाल्या आहेत. परिणामी, शहराची लोकसंख्या आणि नागरी सुविधांची गरज सातत्याने वाढत आहे. अशा परिस्थितीत नागरिकांना त्यांच्या परिसरातच शासकीय सेवा उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याची मागणी होत होती.

स्वतंत्र शिधावाटप कार्यालयाच्या मंजुरीमुळे या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल पडले आहे. मात्र, कार्यालय प्रत्यक्षात कधी सुरू होणार, कार्यालयाचे ठिकाण काय असेल आणि नागरिकांना कोणत्या सेवा उपलब्ध करून दिल्या जाणार, याबाबतची अधिकृत माहिती प्रशासनाकडून स्पष्ट झाल्यानंतर नागरिकांना या सुविधेचा प्रत्यक्ष लाभ कधीपासून मिळणार हे निश्चित होईल.

दरम्यान, प्रशासकीय मंजुरीनंतर कार्यालयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी आणि सेवा सुरू करण्याची प्रक्रिया लवकर पूर्ण करून नागरिकांना त्याचा लाभ मिळावा, अशी अपेक्षा मिरा रोडवासीयांकडून व्यक्त होत आहे. मिरा रोडच्या वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत शासकीय सुविधा अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# गुन्हे अन्वेषण लेखी स्पर्धेत सुवर्णपदक विजेते ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांचा संभाजी ब्रिगेडकडून भव्य सत्कार !

## पोलीस कर्तव्य मेळावा-२०२६ मधील उल्लेखनीय यशाचा गौरव; शाल, पुष्पगुच्छ व पुस्तक देऊन केला सन्मान

**दैनिक युवक आधार**

**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी** : रिसोड शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी तसेच सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने कार्यरत असलेले रिसोड पोलीस स्टेशनचे ठाणेदार तथा पोलीस निरीक्षक रामेश्वर चव्हाण यांचा संभाजी ब्रिगेडच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला.

यवतमाळ येथे पार पडलेल्या पोलीस कर्तव्य मेळावा-२०२६ मध्ये "गुन्हे अन्वेषण" लेखी स्पर्धेत सुवर्णपदक मिळविल्याबद्दल तसेच पोलीस निरीक्षक तथा वाशीम संघप्रमुख व समन्वय अधिकारी रामेश्वर चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली अमरावती परिक्षेत्रात वाशीम जिल्ह्याने उपविजेतेपद पटकावल्याबद्दल त्यांचा हा विशेष सत्कार करण्यात आला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली वाशीम जिल्ह्याच्या पथकाने विविध स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत एकूण १८ पदके जिंकण्याचा मान मिळविला. या उल्लेखनीय यशामुळे जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला असून त्याबद्दल संभाजी ब्रिगेडने त्यांचा गौरव केला.



यावेळी ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांना शाल, पुष्पगुच्छ तसेच प्रेरणादायी पुस्तक भेट देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या कर्तव्यदक्ष, संवेदनशील व जनतेप्रती असलेल्या सकारात्मक कार्यपद्धतीचे कौतुक करत पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

संभाजी ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, पोलीस दल हे समाजाच्या सुरक्षिततेचे मजबूत आधारस्तंभ असून नागरिक आणि पोलीस यांच्यातील समन्वय वाढणे ही काळाची गरज आहे. समाजहितासाठी प्रामाणिकपणे कार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांचा सन्मान केल्याने इतरांनाही प्रेरणा मिळते. याच भावनेतून पोलीस कर्तव्य मेळावा-२०२६ मधील उल्लेखनीय यशाबद्दल ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांचा सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष तथा रिसोड सिटी न्यूजचे मुख्य संपादक अर्जुन पाटील खरात, विनोद खडसे, रमेश सदार, ज्ञानेश्वर सरकटे, शंकर (काका) हजारे, नारायण खोडके यांच्यासह संभाजी ब्रिगेडचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सत्कारानंतर उपस्थितांनी पोलीस प्रशासन व सामाजिक संघटनांनी परस्पर सहकार्याच्या माध्यमातून समाजात शांतता, कायदा-सुव्यवस्था आणि जनजागृतीचे कार्य अधिक प्रभावीपणे राबविण्याचा निर्धार व्यक्त केला.

कार्यक्रमात उपस्थितांनी ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या आगामी सेवाकार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# यासेर उर्दू प्राथमिक शाळेचा 'सीड बॉल' निर्मितीचा अभिनव उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**सेलू प्रतिनिधी शिवाजी पवार** : गौरव सेवाभावी संस्था संचालित यासेर उर्दू प्राथमिक शाळा, सेलू येथे पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा 'सीड बॉल (बीज गोळे) तयार करण्याचा' अभिनव उपक्रम उत्साहात पार पडला. शाळेतील इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांनी या उपक्रमात मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवत विविध स्थानिक वृक्षांच्या बियांचे सीड बॉल तयार केले.

शाळेचे मुख्याध्यापक जावेद खान फेरोज खान पठाण यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. शिक्षक माविया हाश्मी, शोएब अन्सारी तसेच इतर शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

सीड बॉल तयार करण्यासाठी कडुनिंब, चिंच, बोर, बाभूळ, करंज, सीताफळ आदी स्थानिक वृक्षांच्या बिया, लाल चिकणमाती, गांडूळ खत व सेंद्रिय कंपोस्ट खत यांचा वापर करण्यात आला. या उपक्रमासाठी आवश्यक असलेले गांडूळ खत सय्यद इम्रान व सय्यद अमन यांनी उपलब्ध करून दिले.

विद्यार्थ्यांना प्रथम चिकणमाती, कंपोस्ट खत आणि बियांचे योग्य प्रमाणात मिश्रण तयार करण्याची माहिती देण्यात आली. त्यानंतर त्यामध्ये आवश्यकतेनुसार पाणी घालून मिश्रण मळून साधारण २ ते ३ सेंटीमीटर आकाराचे गोल सीड बॉल तयार करण्यात आले. तयार झालेले सीड बॉल २४ ते ४८ तास सावलीत वाळविण्यासाठी ठेवण्यात आले.यावेळी विद्यार्थ्यांना सीड बॉलचे महत्त्व आणि त्याचे पर्यावरणीय फायदे समजावून सांगण्यात आले. दुर्गम डोंगर, जंगल किंवा मोकळ्या जागेत हे सीड बॉल सहज टाकता येतात. पावसाळ्यात पावसाचे पाणी लागल्यानंतर माती वितळते आणि त्यामधील बिया नैसर्गिकरीत्या रुजून झाडांची वाढ सुरू होते. तसेच माती व खताच्या संरक्षणामुळे बियांचे पक्षी व इतर प्राण्यांपासूनही संरक्षण होते.

या उपक्रमामुळे वृक्षारोपण अधिक सुलभ होण्यास मदत होते, हरित क्षेत्रात वाढ होते आणि जागतिक तापमानवाढीच्या समस्येवर मात करण्यासाठी हा एक प्रभावी पर्यावरणपूरक उपाय असल्याची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासोबतच प्रत्यक्ष कृतीतून निसर्गसंवर्धनाची शिकवण देणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला.

# सावळदबारा येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन व वृक्षारोपण




**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे**

**सिल्लोड:-** सोयगाव तालुक्यातील सावळदबारा येथील जय कालिंका देवी शिक्षण प्रसारक संस्था संचलित छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, सावळदबारा व कै.लक्ष्मणराव भीमराव कोलते पाटील वरिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकानुसार उपमुख्यमंत्री अजित अनंतराव पवार यांची जयंती विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली.कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्था अध्यक्ष भाऊराव कोलते यांच्या हस्ते अजित पवार यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्था संचालक मंडळ व प्रशासकीय अधिकारी तसेच उपस्थित मान्यवरांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. जयंतीनिमित्त विद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.लावलेल्या वृक्षांचे संगोपन, संरक्षण व संवर्धन करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना करण्यात आले.यावेळी प्रा. जीवन कोलते यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून अजित पवार यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. महाराष्ट्राच्या जडणघडणीत तसेच राज्याच्या राजकारण व विकास प्रक्रियेत अजित पवार यांचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी सांगितले. शिस्तप्रिय, परखड आणि विकासाचा ध्यास असलेले कणखर व निर्णयक्षम नेतृत्व म्हणून अजित पवार यांचे कार्य कायम स्मरणात राहील, असेही त्यांनी नमूद केले.

अजित पवार यांच्या कार्यातील विविध पैलूंवर प्रकाश टाकताना ते विकासाचे शिल्पकार, कडक प्रशासक, अर्थतज्ज्ञ आणि सर्वसामान्यांचे नेते म्हणून ओळखले जात असल्याचे सांगण्यात आले.बारामतीसह संपूर्ण महाराष्ट्रातील विकासकामे,पायाभूत सुविधांचा विस्तार, प्रशासनावरील मजबूत पकड, कामातील अचूकता आणि वक्तशीरपणा यामुळे त्यांच्या कार्याची वेगळी ओळख निर्माण झाली.राज्याच्या अर्थकारणाला शिस्त लावून विकासाला गती देण्यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिल्याचे यावेळी सांगण्यात आले. जनतेचे प्रश्न तातडीने मार्गी लावणे तसेच कार्यकर्ते व सर्वसामान्य नागरिकांशी थेट संपर्क ठेवण्याची त्यांची कार्यपद्धती प्रेरणादायी असल्याचे उपस्थितांनी नमूद केले.

विजयसिंह राजपूत व भास्कर खमाठ यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. तर विकास पाटील सर यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले. कार्यक्रमास संस्था अध्यक्ष भाऊराव कोलते,संस्था संचालक मंडळ,प्रशासकीय अधिकारी, प्रा. जीवन कोलते,विजयसिंह राजपूत, भास्कर खमाठ,विकास पाटील यांच्यासह विद्यालय व वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नकाशावर घाटंजी आहे की नाही? । पैनगंगेचं पाणी ताडसावडीत अन् एमआयडीसी भलतीकडेच!"

## आर्णीला एमआयडीसी, पांढरकवड्याला विस्तार... मग घाटंजीने कोणता गुन्हा केलाय?'

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी - महेश पेन्दोर** : आमदार राजूभाऊ तोडसाम यांनी विधानसभेत आर्णी आणि पांढरकवडा (केळापूर) येथे एमआयडीसी उभारणीचा मुद्दा उपस्थित करून मतदारसंघाच्या औद्योगिकीकरणाला तोंड फोडले, ही निश्चितच कौतुकास्पद बाब आहे. परंतु, या संपूर्ण प्रस्तावातून **घाटंजी तालुक्याला पूर्णपणे वगळणे** ही केवळ प्रशासकीय दुर्लक्षता नसून, वर्षानुवर्षे रोजगारासाठी भटकणाऱ्या स्थानिक तरुणांच्या आणि संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या हक्कावर थेट डल्ला मारण्यासारखे आहे.

विधानसभेत मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करताना तिन्ही तालुक्यांचा समतोल विकास साधणे लोकप्रतिनिधींचे आद्य कर्तव्य असते. मग प्रश्न असा उपस्थित होतो की, एमआयडीसीचा प्रस्ताव मांडताना विकासाचा 'ॲक्सिस' फक्त दोनच शहरांभोवती का फिरवला गेला?

एमआयडीसी किंवा कोणत्याही मोठ्या उद्योगाचा मुख्य आत्मा 'पाणी' हा असतो. **घाटंजी तालुक्यातील ताडसावडी गावापासून अवघ्या ३ ते ४ किलोमीटर अंतरावर 'निम्न पैनगंगा प्रकल्प' उभारी घेत आहे.** जिथे उद्योगांना लागणारा मुबलक पाणीपुरवठा नैसर्गिकरीत्या उपलब्ध आहे, त्याच तालुक्याला औद्योगिक नकाशावरून पुसून टाकण्याचा घाट का घातला जातोय?

पाण्यासोबतच वर्धा-यवतमाळ-नांदेड रेल्वे लाईन आणि महामार्गांचे जाळे घाटंजीला जोडत आहे. ज्या तालुक्याकडे मुबलक पाणी, दळणवळणाची साधने आणि उत्तम दर्जाचे 'पांढरे सोने' (कापूस) उपलब्ध आहे, त्याला एमआयडीसीपासून दूर ठेवणे म्हणजे तांदळाचे कोठार सोडून धान्याची भीक मागण्यासारखे आहे.

घाटंजी तालुक्यात आज जिल्ह्यामध्ये सर्वाधिक आदिवासी समाज वास्तव्यास आहे. या दुर्गम आणि ग्रामीण भागातील हातांना रोजगार मिळणे आजही अत्यंत कठीण बनले आहे. मोठे नेते आणि मंत्री या भागातून होऊन गेले, तरीही घाटंजीच्या नशिबी आलेला उपेक्षेचा कलंक पुसला गेला नाही.

जर घाटंजी तालुक्यात एमआयडीसी झाली, तर सर्वात मोठा दिलासा या आदिवासी बांधवांना आणि स्थानिक बेरोजगारांना मिळेल. शिक्षणाची सनद हातात धरून नागपूर, पुणे किंवा मुंबईच्या वाटेवर भटकणाऱ्या हजारो सुशिक्षित तरुणांना स्वतःच्या मायभूमीत ५ ते ८ हजार थेट नोकऱ्या उपलब्ध होतील. सुरक्षारक्षक, वाहतूक, छोटे व्यावसायिक, हॉटेल उद्योग आणि बांधकामाच्या माध्यमातून संपूर्ण तालुक्यात रोजगाराची नवी पहाट उतरेल.

घाटंजी तालुक्याला नेहमीच 'कृषीप्रधान' म्हणून गौरवण्यात आले, पण प्रत्यक्षात याच शेतकऱ्याची अवस्था बिकट झाली आहे. आज या पट्ट्यात **पीक विमासुद्धा वेळेवर मंजूर होत नाही**, नैसर्गिक आपत्ती आणि बाजारातील अनिश्चिततेमुळे वैतागून अनेक शेतकरी शेती सोडण्याच्या मानसिकतेत आले आहेत.

अशा बिकट परिस्थितीत जर घाटंजीमध्ये **'टेक्सटाईल आणि ॲग्रो-प्रोसेसिंग एमआयडीसी'** उभी राहिली, तर ते शेतकऱ्यांसाठी वरदान ठरेल. शेतात पिकणारा कापूस थेट स्थानिक सूतगिरणीत जाईल, सोयाबीनवर प्रक्रिया करणारे प्रकल्प इथेच सुरू होतील. मध्यस्थांची दलाली संपून शेतकऱ्याच्या पिकाला थेट भाव मिळेल. शेतीला उद्योगाची जोड मिळाल्यास शेतकरी आत्महत्याग्रस्त पट्ट्याला हा एक मोठा आर्थिक आधार ठरेल.

केवळ दोन तालुक्यांची नावे विधानसभेत मांडून **त्रिभुज विकासाचा समतोल बिघडवला गेला आहे.** जर आर्णीला नवी एमआयडीसी मिळू शकते आणि पांढरकवड्याला विस्तार मिळू शकतो, तर घाटंजीने असा कोणता गुन्हा केला आहे?

घाटंजी हे केवळ दोन शहरांमधील 'कनेक्टिंग टाऊन' राहू शकत नाही. लोकप्रतिनिधींनी विधानसभेत **"आर्णी - घाटंजी - पांढरकवडा"** अशा संयुक्त इंडस्ट्रियल कॉरिडॉरचीच मागणी केली पाहिजे. पाण्याचा महा-स्त्रोत, रेल्वेचे नेटवर्क, कापसाची समृद्धी आणि हाताला रोजगाराची आस असणारा आदिवासी बहुल घाटंजी तालुका आज आपल्या हक्काच्या एमआयडीसीसाठी ठामपणे उभा आहे!

# युवा मार्गदर्शक सचिन काटे यांच्या मार्गदर्शनाखाली लोणार तालुक्यातील पिंपरी खंदारे येथे 'विचार तरुणाईचा'चा महामंच; शेकडो युवकांच्या उपस्थितीत घडणार परिवर्तनाची नवी दिशा!

## बुलढाणा जिल्ह्यातील लोणार तालुक्यातील पिंपरी खंदारे येथील हॉटेल विसावा येथे विशेष चर्चासत्र

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्स्ना करवाडे विदर्भ संपादिका लोणार (बुलढाणा)** : युवकांमध्ये सकारात्मक विचार, सामाजिक बांधिलकी, नेतृत्व क्षमता आणि राष्ट्रनिर्मितीची जाणीव दृढ करण्याच्या उद्देशाने द्वारका बहुउद्देशीय सामाजिक संस्था संचलित अस्तित्व फाउंडेशनच्या वतीने "विचार तरुणाईचा" या विशेष चर्चा सत्राचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. बुलढाणा जिल्ह्यातील लोणार तालुक्यातील पिंपरी खंदारे येथील हॉटेल विसावा, शाखा क्र. २ येथे २४ जुलै रोजी दुपारी १२ वाजता हा बहुप्रतिक्षित कार्यक्रम होणार असून, शेकडो युवक, विविध मित्र मंडळे, सामाजिक कार्यकर्ते, विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. युवकांच्या वैचारिक परिवर्तनाला चालना देणारा आणि समाजात सकारात्मक बदल घडवून आणणारा हा उपक्रम ठरणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

या उपक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक सचिनजी काटे हे आहेत. बुलढाणा जिल्ह्यातील साखरखेर्डा येथील सचिन काटे यांनी युवकांना सामाजिक कार्य, नेतृत्व, उद्योजकता आणि विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सातत्याने विविध उपक्रम राबविले



आहेत. त्यांच्या प्रेरणेतून अनेक युवक समाजहिताच्या कार्यात सक्रिय झाले असून, त्यामुळे त्यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या चर्चासत्राकडे विशेष लक्ष लागले आहे.

कार्यक्रमाचे नियोजन आशुतोष गायकवाड आणि वितेश चव्हाण यांनी केले असून, युवकांच्या सहभागातून समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्याचा संकल्प या माध्यमातून करण्यात आला आहे. विविध युवक संघटना, मित्र मंडळे आणि शेकडो तरुण या चर्चासत्राला उपस्थित राहणार असून, युवकांच्या भविष्याशी आणि समाजाच्या विकासाशी निगडित विविध महत्त्वपूर्ण विषयांवर मुक्त चर्चा केली जाणार आहे.

या चर्चासत्रात आजचा तरुण आणि समाजातील भूमिका, जबाबदार नागरिक म्हणून कर्तव्य, समाजपरिवर्तनात युवकांचा सहभाग, शिक्षण, कौशल्य विकास, रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी, व्यसनमुक्त तरुणाई, निरोगी जीवनशैली, डिजिटल युगातील संधी व आव्हाने, सोशल मीडियाचा सकारात्मक वापर, सायबर सुरक्षा, गाव विकासात युवकांची भूमिका, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, ग्रामसभेत सक्रिय सहभाग, पारदर्शक प्रशासन, नेतृत्व विकास, संघभावना, संवाद कौशल्य, महिला सन्मान, स्त्री-पुरुष समानता, मानसिक स्वास्थ्य, तणाव व्यवस्थापन, रक्तदान, वृक्षारोपण, समाजसेवा, गरजूंना मदतीचा हात तसेच "माझे गाव – माझी जबाबदारी" आणि भ्रष्टाचारमुक्त गाव या विषयांवर सखोल मार्गदर्शन व विचारमंथन होणार आहे.

विशेष म्हणजे, या कार्यक्रमातून

> 'आजचा युवक हा उद्याच्या भारताचा शिल्पकार आहे. सकारात्मक विचार, समाजाप्रती जबाबदारी आणि कृतीशील नेतृत्व यांच्या बळावर आपण आपल्या गावापासून राष्ट्रापर्यंत परिवर्तन घडवू शकतो. प्रत्येक युवकाने स्वतःसाठी नव्हे तर समाजासाठी जगण्याचा संकल्प करावा. चला... विचार करूया, चर्चा करूया आणि परिवर्तनाचे भागीदार बनूया.'
> — सचिनजी काटे
> प्रमुख मार्गदर्शक – 'विचार तरुणाईचा' विशेष चर्चा सत्र

केवळ विचारांची देवाणघेवाणच नव्हे तर सामाजिक बांधिलकी जपत गरजू नागरिकांना वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्याचाही संकल्प करण्यात आला आहे. समाजातील प्रत्येक घटकासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा आणि समाजहिताची जबाबदारी स्वीकारावी, हा मुख्य संदेश या चर्चासत्रातून दिला जाणार आहे.

आयोजकांनी सर्व युवक, विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या वैचारिक चळवळीचा भाग बनावे, असे आवाहन केले आहे.

# एअर फ्रेशनरला फाटा द्या, ही घरातील रोपे प्रत्येक ऋतूत तुमचे घर अप्रतिम सुगंधाने भरून टाकतील

टोस्टला लोणी लावायला लागणाऱ्या वेळेपेक्षाही कमी वेळात, सुगंध तुम्हाला तुमच्या बालपणात घेऊन जाऊ शकतो. पुदिन्याचा एक वास घेतला की तुम्ही तुमच्या आजीच्या स्वयंपाकघरात पोहोचता. एखाद्या उबदार संध्याकाळी मोगऱ्याचा सुगंध घेतला की, अचानक प्रेम शक्य वाटू लागतं. मात्र, आधुनिक घरांना बागेसारखा सुगंध येत नाही. त्यांचा सुगंध म्हणजे कालच्या जेवणाचा, नुकत्याच धुतलेल्या कपड्यांचा, चहाचा आणि बुटांमधून येणाऱ्या कोणत्यातरी रहस्यमय वासाचं एक विचित्र मिश्रण असतं.

सामान्य उपाय म्हणजे सुगंधी मेणबत्ती लावणे किंवा इलेक्ट्रिक डिफ्यूझर लावणे. हे उपाय उत्तम काम करतात, पण त्यांचा एक तोटा असा आहे की ते निवडणुकीच्या काळातल्या राजकारण्यांसारखे असतात: ते मोठी मोठी आश्वासने देतात, काही काळ झगमगतात आणि मग दिसेनासे होतात. याउलट, वनस्पती अधिक विश्वासार्ह सोबती आहेत. फुलांच्या गुच्छांप्रमाणे नाही, जे पाण्यात ठेवल्या ठेवल्याच हळूहळू कोमेजायला लागतात, तर सुगंधी घरातील वनस्पती महिना दर महिना, कधीकधी तर वर्षानुवर्षे तुम्हाला आनंद देत राहतात. त्या नैसर्गिकरित्या तुमच्या घरात सुगंध पसरवतात, काही प्रमाणात हवा शुद्ध करतात, निस्तेज कोपऱ्यांना उजळ करतात आणि जसजसे वय वाढते तसतसे अधिक आकर्षक होत जातात.

येथे सहा अप्रतिम सुगंधित घरातील वनस्पती आहेत, ज्या तुमच्या घराला एखाद्या वनस्पती उद्यानात बदलू शकतात.

**१. मादागास्कर जाई**

जर फुलांना व्यक्तिमत्त्व असते, तर मादागास्कर जाई ही एक सहज सुंदर पाहुणी ठरली असती, जी कधीही आवाज न चढवताही सर्वांचे लक्ष वेधून घेते. तिच्या मेणासारख्या, ताऱ्याच्या आकाराच्या पांढऱ्या फुलांमधून एक अत्यंत गोड सुगंध येतो, ज्याची तुलना अनेकदा महागड्या परफ्यूमशी केली जाते. फुलांनी बहरलेली एक वेल संपूर्ण खोली सुगंधित करू शकते, विशेषतः संध्याकाळी. झाडाला फुले नसतानाही त्याची चकचकीत हिरवी पाने आकर्षक दिसतात, ज्यामुळे वर्षभर ही एक सुंदर भर ठरते.

**काळजी घेण्याच्या सूचना**

तेजस्वी, अप्रत्यक्ष सूर्यप्रकाश सर्वोत्तम असतो. पूर्वेकडील किंवा दक्षिणेकडील खिडकीजवळची जागा उत्तम ठरते, मात्र त्यासाठी दुपारचे प्रखर ऊन गाळले जाणे आवश्यक आहे.

वसंत आणि उन्हाळ्यात माती हलकी ओलसर ठेवा, आणि दोन वेळांच्या मध्ये फक्त वरचा एक इंच थर कोरडा होऊ द्या. हिवाळ्यात पाणी कमी करा, पण माती पूर्णपणे कोरडी होऊ देऊ नका.

**२. होया लॅकुनोसा**


होया लॅकुनोसा हे सिद्ध करते की आकार ही एक अनावश्यक संकल्पना आहे. याची फुले लहान असली तरी त्यांचा सुगंध आश्चर्यकारकपणे तीव्र असतो. अनेक लोक याचे वर्णन दालचिनी, व्हॅनिला आणि मध यांचे मिश्रण असे करतात, जे विशेषतः संध्याकाळी जाणवते. याच्या पसरणाऱ्या वेलींमुळे हे हँगिंग बास्केट किंवा उंच शेल्फसाठी देखील आदर्श ठरते, जिथे याची पाने कडांवरून सुंदरपणे खाली लोंबू शकतात.

**काळजी घेण्याच्या सूचना**


तेजस्वी, अप्रत्यक्ष प्रकाशामुळे वारंवार फुले येतात. हे कमी प्रकाशातही तग धरू शकते,













पण फुले कमी येऊ शकतात.

पुन्हा पाणी घालण्यापूर्वी मातीचा वरचा अर्धा भाग सुकू द्या. होयाच्या मुळांवर सतत ओलावा असणे त्यांना आवडत नाही आणि जास्त पाणी घालण्यापेक्षा थोडे दुर्लक्ष केल्यास त्या अधिक आनंदी राहतात.

**३. कॅटलिया ऑर्किड**

ऑर्किड असतात. आणि मग येतात कॅटलिया. त्यांची फुले मोठी, आकर्षक आणि अनेकदा प्रचंड सुगंधी असतात, ज्यांचा सुगंध लिंबूवर्गीय फळे आणि व्हॅनिलापासून ते मसाले आणि मधापर्यंत विविध प्रकारचा असतो. काही जाती तर केवळ मूठभर फुलांनी संपूर्ण खोली सुगंधित करतात.

**काळजी घेण्याच्या सूचना**

तेजस्वी, गाळलेला प्रकाश आवश्यक आहे. सकाळचा सूर्यप्रकाश उत्तम असतो, पण दुपारच्या तीव्र किरणांपासून दूर राहा.

वाढीचे माध्यम जवळजवळ कोरडे झाल्यावर भरपूर पाणी द्या. पाण्याचा चांगला निचरा होणे आवश्यक आहे, कारण ऑर्किडच्या मुळांना पाण्यात राहणे आवडत नाही.

**४. पुदिना**

पुदिन्याला आकर्षक फुले येत नसतील, पण त्याची त्याला गरजही नसते. पानांना हात लावताच, खोली त्या विशिष्ट थंड, ताजेतवाने करणाऱ्या सुगंधाने भरून जाते. ही वाढवण्यासाठी सर्वात सोप्या सुगंधी वनस्पतींपैकी एक आहे आणि चहा, मिठाई व उन्हाळ्यातील पेयांना चव देण्याचा अतिरिक्त फायदाही मिळतो. सावध रहा: बाहेर पुरेशी जागा मिळाल्यास, पुदिन्याच्या विस्ताराच्या योजना एखाद्या साम्राज्याला शोभतील अशा असतात. मात्र, घरात एक कुंडी त्याच्या विस्ताराला व्यवस्थित नियंत्रणात ठेवते.

**काळजी घेण्याच्या सूचना**

दररोज चार ते सहा तास सूर्यप्रकाश मिळणे आदर्श आहे. ते प्रखर अप्रत्यक्ष प्रकाशातही चांगली वाढ दाखवते.

माती सतत ओलसर ठेवा, पण त्यात पाणी साचू देऊ नका. पुदिन्याला इतर औषधी वनस्पतींपेक्षा जास्त पाण्याची गरज असते आणि त्याला नियमित पाणी देणे फायदेशीर ठरते.

**५. प्लुमेरिया**

जर उष्णकटिबंधीय बेटावर तुमचे स्वागत फुलांच्या माळेने झाले असेल, तर तुम्ही प्लुमेरियाला आधीच भेटला असण्याची शक्यता आहे. ही अत्यंत सुगंधी फुले सुट्ट्या, समुद्रकिनारे आणि नारळाच्या झाडांखालील उबदार संध्याकाळची आठवण करून देतात. जातीनुसार, या सुगंधात लिंबूवर्गीय फळे, मोगरा, पीच किंवा नारळाचा सुगंध असू शकतो. फुले नसतानाही, याच्या कलात्मक फांद्या खोलीला किंवा बाल्कनीला एक आकर्षक वास्तुशिल्पीय रूप देतात. संयम महत्त्वाचा आहे. प्लुमेरियाला भव्य फुलांचे बक्षीस देण्यापूर्वी वेळ घ्यायला आवडते.

**काळजी घेण्याच्या सूचना**

प्लुमेरियाला भरपूर सूर्यप्रकाश आवडतो आणि चांगल्या प्रकारे फुलण्यासाठी त्याला दररोज किमान सहा तास थेट सूर्यप्रकाशाची आवश्यकता असते.

वाढीच्या सक्रिय काळात भरपूर पाणी द्या आणि दोन वेळा पाणी देण्याच्या मधल्या काळात माती किंचित कोरडी होऊ द्या. हिवाळ्यातील सुप्तावस्थेच्या काळात पाणी देणे लक्षणीयरीत्या कमी करा.

**६. निलगिरी**

आलिशान स्पाना निलगिरी इतकी का आवडते यामागे एक कारण आहे. त्याच्या चंदेरी-निळ्या पानांचा ताजेतवाना, स्वच्छ सुगंध जागेला त्वरित शांत करतो. निलगिरी वर्षभर सुगंधित असते, फुलांशिवायही, विशेषतः जेव्हा पानांना हलकासा स्पर्श केला जातो. त्याची मोहक पाने आधुनिक अंतर्गत सजावटीतही एक सुंदर भर घालतात.

**काळजी घेण्याच्या सूचना**

ते उपलब्ध असलेल्या सर्वात तेजस्वी ठिकाणी ठेवा. निलगिरीला भरपूर सूर्यप्रकाश आवडतो.

जेव्हा मातीचा वरचा एक इंच थर कोरडा वाटेल. मुळे साचलेल्या पाण्यात ठेवणे टाळा, पण झाड जास्त काळ कोरडेही ठेवू नका. अधूनमधून छाटणी केल्याने घरातील झाडाचा आकार नियंत्रणात ठेवण्यासही मदत होते.

लाखो वर्षांनंतरही सुगंधित घरातील वनस्पती आपल्याला मोहित करत आहेत. त्यांना प्रकाश, पाणी आणि अधूनमधून लक्ष देण्यापलीकडे फार काही लागत नाही. त्या बदल्यात, त्या सौंदर्य, अधिक स्वच्छ दिसणारी जागा, फुलांचे बदलणारे ऋतू आणि कृत्रिम न वाटता जिवंत वाटणारा सुगंध देतात.

# कडधान्ये की पालेभाज्या, पावसाळ्यात आरोग्यासाठी योग्य काय?

पावासाची जोरदार बॅटिंग सुरू असून सर्वत्र आल्हाददायक वातावरण सुरू आहे. परंतू पावसाळ्याचा ऋतू जितका आल्हाददायक असतो, तितकाच तो आरोग्याच्या दृष्टीने आव्हानात्मक मानला जातो. या दिवसांत हवामानातील दमटपणा मुळे पचनसंस्था मंदावते आणि विविध संसर्गाचा धोका वाढतो. अशा वेळी रोजच्या आहारात पालेभाज्या खाव्यात की कडधान्ये? असा प्रश्न अनेकांना पडतो. आरोग्यतज्ज्ञांच्या मते कडधान्ये की पालेभाज्या, पावसाळ्यात शरीरासाठी काय योग्य हे जाणून घेऊयात.

**पालेभाज्या खाणे किती सुरक्षित?**

पावसाळ्यात पालक, मेथी, लाल माठ यांसारख्या पालेभाज्यांमध्ये बॅक्टेरिया, बुरशी आणि कीटकांची अंडी साचण्याचा धोका अधिक असतो. त्यामुळे शक्यतो टाळावे. यासह दमट वातावरणामुळे या दिवसात



पालेभाज्या लवकर खराब होतात.

**तज्ज्ञ यावर काय सांगतात?**

पावसाळ्यात कच्च्या किंवा अर्धवट शिजवलेल्या पालेभाज्या खाणे टाळावे.

जर पालेभाज्या खायच्या असतील तर त्या कोमट मिठाच्या पाण्याने स्वच्छ धुवून, योग्य प्रकारे शिजवूनच खाव्यात.

**कडधान्ये खाणे किती सुरक्षित?**

पावसाळ्यात पालेभाज्यांच्या तुलनेत कडधान्ये जसे की मूग, मटकी, हरभरा, मसूर अधिक सुरक्षित मानली जातात.

कडधान्यांमध्ये भरपूर प्रमाणात प्रोटीन्स, फायबर आणि जीवनसत्त्वे असतात, जे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात.

**काळजी काय घ्याल?**

पावसाळ्यात पचनशक्ती मंद असल्यामुळे कडधान्ये नीट भिजवून, मोड आणून आणि व्यवस्थित शिजवून खावीत.

कच्ची मोड आलेली कडधान्ये खाणे टाळावे, कारण यामुळे पोटाचे आरोग्य बिघडू शकते.

**शरीरासाठी योग्य काय?**

थोडक्यात सांगायचे तर पावसाळ्यात कच्च्या पालेभाज्यांपेक्षा चांगल्या प्रकारे शिजवलेली कडधान्ये आणि वेलीवरील भाज्या आरोग्यासाठी अधिक योग्य आणि सुरक्षित पर्याय आहेत.

# किशोरवयीन मुलांसाठी पालक स्वीकारतायत 'टीन-टर्निटी' ट्रेंड

मुलं लहान असताना त्यांना आई-वडिलांची गरज असते, हे सर्वांनाच माहीत आहे. पण अनेकदा मुलं मोठी झाली की त्यांना पालकांच्या सहवासाची गरज कमी होते, असा समज केला जातो. प्रत्यक्षात मात्र किशोरवय हेच आयुष्यातील सर्वात संवेदनशील टप्प्यांपैकी एक मानले जाते. याच काळात मुलांच्या भावनिक, मानसिक आणि सामाजिक आयुष्यात मोठे बदल घडत असतात. त्यामुळेच सध्या जगभरात 'टीन-टर्निटी' (Teen-Ternity) हा नवीन पॅरेंटिंग ट्रेंड चर्चेत आला आहे. चला तर जाणून घेऊया, नेमकं काय आहे हा ट्रेंड आणि काही पालक तो का स्वीकारत आहेत.

teen ternity trend in india

**काय आहे 'टीन-टर्निटी' ट्रेंड?**

'टीन-टर्निटी' हा शब्द Teen



(किशोरवय) आणि Maternity (मातृत्व) या दोन शब्दांपासून तयार झाला आहे. हा एक पॅरेंटिंग दृष्टिकोन आहे. यामध्ये काही पालक किशोरवयीन मुलांसोबत अधिक वेळ घालवण्यासाठी स्वतःहून कामाचे तास कमी करतात, वर्क फ्रॉम होम किंवा फ्लेक्सिबल जॉब निवडतात किंवा काही काळासाठी करिअरमधून ब्रेक घेतात.सध्याच्या काळात किशोरवयीन मुलांवर अभ्यास, करिअर, सोशल मीडिया, मित्रपरिवार, स्पर्धा आणि स्वतःची ओळख निर्माण करण्याचा मोठा ताण असतो. या काळात त्यांना फक्त आर्थिक आधार नव्हे, तर भावनिक आधाराचीही तितकीच गरज असते. मुलं अनेकदा आपल्या भावना उघडपणे व्यक्त करत नाहीत. त्यामुळे पालकांचा वेळ, संवाद आणि उपस्थिती त्यांच्यासाठी खूप महत्वाची ठरते.

**पालकांची भूमिका**

या वयात मुलांमध्ये शारीरिक आणि मानसिक बदल वेगाने घडत असतात. योग्य मार्गदर्शन न मिळाल्यास ते चुकीच्या संगतीत जाणे, सोशल मीडियाचा अतिरेक, आत्मविश्वास कमी होणे किंवा मानसिक तणाव अशा समस्यांना सामोरे जाऊ शकतात. जर पालक त्यांच्यासाठी उपलब्ध असतील, तर मुलं मनातील गोष्टी सहजपणे शेअर करतात आणि निर्णय घेताना त्यांच्यावर विश्वास ठेवतात.

**'टीन-टर्निटी' म्हणजे करिअर सोडणे?**

या ट्रेंडचा अर्थ नोकरी सोडणे असा अजिबात नाही. प्रत्येक पालकासाठी हे शक्यही नसते. मात्र, दिवसातून थोडा वेळ मुलांसाठी राखून ठेवणे, त्यांच्याशी मनमोकळा संवाद साधणे, त्यांच्या मित्रपरिवाराबद्दल जाणून घेणे आणि त्यांच्या भावनांना समजून घेण्याचा प्रयत्न करणे, हाच या ट्रेंडचा मुख्य उद्देश आहे.